
# निकोबारच्या लोककथा




MR
398.209 548 8
R 813 N

रॉबीन रॉयचौधुरी

साहित्य अकादेमी

MR
398.209 548
8
R813N



INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA



SA 206

# निकोबारच्या लोककथा

अस्तरावरील पाषाण चित्रात राजा शुद्धोदनाच्या दरबारातील दृश्य आहे. त्यात तीन ज्योतिषी बुद्धाची आई, मायाला स्वप्नाचा अर्थ समजावून सांगत आहेत. इ.स. च्या दुसऱ्या शतकातील नागार्जुन-कोंडा येथील एका शिळेत कोरलेल्या या प्रसंगात खालच्या बाजूला बसलेला राजचिटणवीस स्वप्नाचा अर्थ लिहून घेत आहे. भारतीय लेखनकलेचा शिल्पबद्ध पुरावा देणारे हे अत्यंत पुरातन शिल्प असावे असा अंदाज आहे.

राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली, यांच्या सौजन्याने

# निकोबारच्या लोककथा

लेखक

**रॉबीन रॉयचौधुरी**

अनुवादक

**अशोक बेंडखळे**

साहित्य अकादेमी

Library IIAS, Shimla
MR 398.209 548 8 R 813 N
00117508

Nicobarchya Lokkatha (निकोबारच्या लोककथा)
A collection of folktales of Nicobar in English by
Rabin Roychowdhury translated
into Marathi by Ashok Bendkhale
Sahitya Akademi, New Delhi (2003), Rs. Sixty

© Sahitya Akademi

First Edition : 2003

MR
398.209 548 8
R 813 N

**Published by :**
Sahitya Akademi

**Head Office :**
Rabindra Bhavan, 35, Ferozeshah Road, New Delhi 110 001

**Sales Department :**
Basement in 'Swati', Mandir Marg, New Delhi 110 001

**Regional Offices :**
172, M.M.G.S. Marg, Dadar (East), Mumbai 400 014
Jeevan Tara, 23A/44X, Diamond Harbour Road, Kolkata 700 053
Central College Campus, Dr. Ambedkar Veedhi, Bangalore 560 001

**Chennai Office :**
C.I.T. Campus, TTTI Post, Taramani, Chennai 600 113

ISBN 81 - 260 -1773-2

मूल्य : 60 रुपये

117508
15/12/04

**Cover Design and Illustrations:** Swapnesh Choudhury

**Typeset by :** Samarth Comprint, 13, Tulsi Bhavan, S.B.Road, Mumbai 400 028

**Printed at :** New Age Printing Press, Prabhadevi, Mumbai 400 025

# अनुक्रमणिका


*निकोबार बेटांची ऐतिहासिक पार्श्वभूमी* ............ 1

*निकोबारी आणि त्यांच्या भिन्न जाति व वंशपरंपरा* ............ 3

*निकोबारींचा विश्वास व धर्मभोळेपणा* ............ 5

*निकोबारींच्या रूढी आणि उत्सव* ............ 7


## लोककथा


| | | |
|---|---|---|
| 1 | सूर्य आणि चंद्र यांची उत्पत्ति ............ | 11 |
| 2 | निकोबारचे उगमस्थान ............ | 13 |
| 3 | अतिउंच आणि बुटके ............ | 15 |
| 4 | एक माणूस अजगर झाला त्याची गोष्ट ............ | 18 |
| 5 | कार-निकोबारची उत्पत्ति ............ | 21 |
| 6 | नारळाच्या झाडाची गोष्ट ............ | 24 |
| 7 | वटवाघुळाचे मूळ ............ | 27 |
| 8 | शार्कमाशाचे मूळ ............ | 29 |
| 9 | छोट्या समूहाचे सामर्थ्य ............ | 32 |
| 10 | चौवरा बेटाचा शोध ............ | 34 |
| 11 | चौवरामध्ये ताडाची झाडे कशी वाढली? ............ | 37 |
| 12 | चौवराच्या लोकांनी घेतलेला सूड ............ | 39 |
| 13 | छोट्या बेटाचे मूळ ............ | 42 |
| 14 | ऑट-न्या. हुम.कु. एक जादूगार ............ | 44 |
| 15 | पिशाच्च आणि रानटी डुकरे ............ | 47 |
| 16 | बोम्पोका बेटाचा जन्म ............ | 50 |
| 17 | शार्क माशाची गोष्ट ............ | 52 |
| 18 | माणसाचे रुपांतर बेडकात कसे झाले ! ............ | 55 |
| 19 | झाडे चालायची का थांबली ............ | 57 |

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | दुष्ट आई | | 59 |
| 21 | किलफ्यूट घरी परत | | 62 |
| 22 | चंद्रावरील मुलगी | ............ | 65 |
| 23 | दुष्ट आत्म्याची जादू | ............ | 69 |
| 24 | राजकन्या आणि तिचा पाळीव कुत्रा | ............ | 72 |
| 25 | मुलगा आणि व्हेल माशाची गोष्ट | ............ | 75 |


## गाण्यातील लोककथा


| | | | |
|---|---|---|---|
| 26 | परदेशी पिशाश्च्याची गोष्ट | ............ | 79 |
| 27 | लोकगीते | ............ | 82 |

# *निकोबार बेटांची ऐतिहासिक पार्श्वभूमी*

निकोबार बेटे म्हणजे 20 बेटांचा एक समूह आहे. ही बेटे अंदमानच्या दक्षिणेला 80 मैलांवर आणि सुमात्रापासून 110 मैलांवर आहेत. त्यातील मुख्य बेटे अशी- कार निकोबार, तिलानचोंग, चौवरा, तेरेस्सा, बोम्पोका, कामोर्टा, नान् कौअरी, काचल, छोटे निकोबार आणि मोठे निकोबार

भौगोलिक दृष्ट्या हा अनेक बेटांचा समुह समुद्राखालून सुमात्रा, मालाय आणि इंडोनेशिया यांच्या मुख्य भूमीशी समोरून जोडला गेला आहे आणि असं मानलं जातं की, 5 ते 13 व्या शतकांमध्ये जेव्हा हिंदुस्थान चीनमधून मोठ्याप्रमाणात स्थलांतर होत होते, तेव्हा मालाय पेनिन्सुकामधून काही रहिवासी या बेटावर स्थलांतरित झाले. स्थलांतरितांसाठी निकोबार आणि इस्ट इंडिज ही स्वाभाविक इच्छित स्थळे होती. निग्रीटोज या बेटांवर त्या अगोदरपासून वसती करून राहत असण्याची शक्यता आहे.

तथापि निकोबारचा पहिला उल्लेख प्रालेमीच्या संग्रहात नागडिपा म्हणजे 'नागड्यांचे बेट' असा आढळतो. चीनच्या नाविकांना हे बेट हजार एक वर्षापूर्वी माहित होते, असे कागदपत्रांवरून दिसते.

दुसरा महत्वाचा उल्लेख एक अरब व्यापाऱ्याच्या लिखाणातून मिळतो. या व्यापाऱ्याच्या निकोबारशी संबंध इ. स.851 च्या सुमारास आला. यामध्ये असा उल्लेख आहे की, नागाबालुस किंवा लांगाबुलुस (निकोबारी) म्हणजे असे स्त्री-पुरुष जे नेहमी नागडे वावरतात. दुसऱ्या एका रशुद्दीन या अरब व्यापाऱ्याने निकोबारींना लाकवारेम किंवा नकावरम असे संबोधिले आहे.

फ्रिअर आँडेरी या युरोपियन प्रवाशानें निकोबारींवर एक प्रकरण लिहिले असून कुत्र्याचा चेहरा असलेल्या या लोकांवर त्यांनी ढीगभर रानटीपणाच्या कल्पित कथा त्यात दिल्या आहेत.

मार्को पोलो या बेटांवरून 1293 मध्ये गेला. त्याने लिहिले की, जेव्हा तुम्ही जावा बेट आणि लाम्ब्रीचे राज्य सोडता. तुम्ही पुढे 160 मैल उत्तरेकडे गेल्यावर दोन बेटांवर पोचता त्यातील म्हणजे नेकुवेरम् होय. या बेटावर कुणी राजा वा प्रमुख नाही. परंतु माणसे जनावरांसारखी राहतात. तुम्हाला एक सांगतो, इथले स्त्री-पुरुष दोघेही नागडी वावरतात.

दुसऱ्या एका बार्बोसा नावाच्या प्रवाशाने इस्ट आफ्रिका आणि मलबार मध्ये लिहिले की,

सुमात्राच्या समोर गंगेच्या आखाताला लागून पाच किंवा सहा बेटे आहेत. या बेटांवर चांगले पाणी आहे. जहाजांसाठी बंदरे असून त्यावर गरीब लोक वस्ती करून राहतात. त्यांना निकोबार म्हटले जाते.

सर जेक्स लॅन्कस्टरने या बेटांना 1602 मध्ये भेट दिली आणि त्यावर लिहिले- 'हे लोक बेटांवर नागडे वावरत असतात आणि शरीराचे खाजगी भाग तागाच्या कापडाच्या एका फडक्याने बांधलेले असतात आणि कमरेवर तो कमरपट्ट्याप्रमाणे वागवतात.' त्याने त्यांचे काही धर्मगुरू पाहिले त्या सर्वांनी तंग कपडे घातले होते आणि त्यांच्या डोक्यावर दोन शिंगे होती आणि त्यांची टोके मागे वळली होती. त्यांना हिरव्या, काळ्या व पिवळ्या रंगानी रंगविलेले होते आणि ती शिंगेसुद्धा त्याच रंगानी रंगविली होती. त्यांच्या पाठीमागे एक शेपटी लोंबकळत असून त्यामुळे ते रंगविलेल्या पिशाश्च्यासारखे दिसतात.

सतराव्या शतकाच्या मध्याला कोपिंग हा ब्रिटीश प्रवासी एका बेटावर उतरला आणि त्याने शेपटी असलेली माणसे पाहिली. ही माणसे एखाद्या मांजरासारखी इकडे तिकडे धावत होती. त्याच्या मते, निकोबार निवासी नरमांसभक्षक होते.

पुढे येते डाम्पिअरने केलेले या बेटावरील त्याच्या मुक्कामाचे वर्णन तो या बेटांवर लांबी रुंदीच्या दृष्टीने खूप फिरला. लोकांच्या राहणी पद्धतीत बदल होऊनही त्याचे वर्णन आजच्या दिवशी सुद्धा सूप बिनचुक वाटते.

क्षेसूज लोकांनी कार निकोबर बेटांबर प्रथम स्थाईक होण्याचा प्रयत्न 1711 मध्ये केला. शेवटी 1869 मध्ये ब्रिटीश सरकारने त्यावर वसाहत स्थापन केली. ब्रिटीश इथं आल्यावर निकोबार रहिवाशांची आधुनिक जगाशी ओळख झाली.

❑❑❑

# निकोबारी आणि त्यांच्या भिन्न जाति व वंशपरंपरा

असे मानले जाते की, निकोबारी हे एका वंशाचे आहेत आणि ते इंडोचायना वंशापासून उत्पन्न झाले असावेत. हा वंश तिबेट-बर्मापासून वेगळा आहे. इंडो-चायनीज वंशाचे सारखे गुणधर्म असल्यामुळे ते मलायान्स आणि बर्मीज यांच्या दरम्यानचे गणले जातात.

कॅप्टन अलेक्झांडर हॅमिल्टनच्या मते, निकोबर बेट हे पलिकडच्या बाजूचे मुख्य बेट आणि पागुचा किनारा येथून आलेल्या लोकांनी तयार झाले. त्यांच्या विचारसरणीतील सारखेपणा तसेच निकोबारी आणि पागु भाषेमध्ये आढळणारे साम्य हे या गोष्टीचा पुरावा आहे.

अगदी आजही निकोबारची स्वतःची लिपी नाही. त्यांची भाषा ही बोली भाषा असून फक्त रोमन लिपी लिहिण्यासाठी वापरली जाते. ते बोलत असलेल्या भाषेचा संबंध पागु अन्नान आणि कंबोडियामध्ये बोलणाऱ्या इंडो-चायनीज भाषेशी आहे. सहा प्रकारच्या बोलीभाषा या द्वीपसमुहात बोलल्या जातात. एक प्रकारची भाषा निकोबार मध्ये तर दुसरी चौवरामध्ये आणि तेरेस्सा व बोम्पोका या विभागात तिसरी बोलली जाते मध्य भागातील कामोर्टा, नानकोवरी ट्रिन्केट मध्ये आणि काचल बेटांमध्ये चौथ्या प्रकारची. तर छोट्या व मोठ्या निकोबारमध्ये पाचव्या बोली भाषेचा वापर होतो. ग्रेट निकोबारमधील शोम्पेन्समध्ये सहावी बोली भाषा बोलली जाते.

प्रा. ए. एच. किने यांच्या म्हणण्यानुसार निकोबारी भाषा सर्व साधारणपणे शब्द उच्चाराच्या दृष्टीने अतिशय संपन्न आहे आणि तीमध्ये 25 अक्षरे आणि 35 स्वर व्यंजने आहेत. या भूमीतील लोकांचा पोर्तुगीज, डॅनिश, चायनीज, बर्मीज, इंग्लिश आणि भारतीय लोकांशी संबंध असल्यामुळे या भाषांमध्ये अनेक परकीय शब्द एकरुप झाले.

निकोबारी बेटावरील मूळ निकोबारी वंशाचे असले तरी त्यांच्यामध्ये विस्मयकारक भेद निर्माण होण्यात अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये दोन भिन्न जाती गट आहेत. एक शोम्पेन जो ग्रेट निकोबर मधल्या अंतर्गत भागात राहतो आणि दुसरा किनाऱ्यावर वस्ती करून राहणारा निकोबारी होय.

बाहेरच्या आधुनिक जगापासून अनेक शतके दूर राहिल्यामुळे त्यांनी आपले मूळ स्वरुप कायम ठेवले आहे. त्यांची अति प्राचीन संस्कृती कुठल्याही बाहेरच्या प्रभावाशिवाय वृद्धिंगत

झाली. अगदी अलिकडे इस्लामच्या प्रभावामुळे आणि ख्रिश्चन मिशनरींच्या प्रचारामुळे त्यांच्या वागण्याच्या पद्धतीमध्ये खूप बदल घडत गेले आणि ते आता अर्ध-आधुनिक जीवन कंठित आहेत. तथापी शिक्षित झालेले काही निकोबारी त्यांच्या जुन्या संपन्न परंपरेचे महत्त्व जाणतात. त्यांची अनेक शतकांची जुनी संस्कृती जपण्याचा ते प्रयत्न करतात आणि आजच्या नव्या काळात ती संस्कृती पुनरूज्जीवित करू पाहतात.

❑❑❑

# *निकोबारींचा विश्वास व धर्मभोळेपणा*

निकोबारी लोकांमध्ये दिव्य शक्तीची संकल्पना अस्तित्वात नाही. ईश्वर संकल्पना त्यांच्याकडे अगदी अलिकडे खिश्चन मिशनऱ्यांकडून आली. दृष्ट आत्मा हा प्रघात, ज्याला त्यांच्या भाषेमध्ये इवी म्हणतात, त्यांच्या आयुष्यामध्ये अतिप्रभावशाली आहे. या आत्म्याची मनधरणी, हवन वा बलिदान देऊन केली जाते आणि भूतबाधेद्वारे त्यांना दूर ठेवले जाते.

त्यांच्याकडे चेटक चिकित्सक (शमान्स) असतात, जे पाने, राख, झाडु, दंडुके यांच्या साहाय्याने काही कर्म क्रिया करून आत्म्याशी संवाद साधू शकतात आणि त्या भागाती दृष्ट आत्म्यास दूर पळवून लावतात.

निकोबारमधील पद्धतीप्रमाणे मंत्रतंत्र, औषधे भूत पिशाश्च्यांना दूर पळविणारी वंशचिन्हे इत्यादी प्रकाराने केलेले जादू टोणे मलाया द्विपसमुहामध्ये तसेच पापून्समध्ये सुद्धा उपयोगात आणले जातात.

ज्यांना भूतबाधा झाली असावी असे वाटते ती नाहिशी करण्यासाठी सर्वसाधारण पाळला गेलेला प्रकार म्हणजे झाडांच्या पानानी त्यांना झटकणे हा होय. जर एखाद्या माणसाचे बोटीमध्ये निधन झाले असेल तर जेव्हा ती बोट गावात परत येते, तेव्हा दोन प्रौढ माणसे धावतात आणि ती बोट किनाऱ्या लागण्यापूर्वी ते त्या बोटीला आणि बोटीवरील माणसांना झाडूने झटकतात. त्यानंतर ती बोट नारळाच्या पानांनी सुद्धा झटकली जाते, जेणेकरून निधन झालेला व्यक्तीचे भूत त्यांच्यावर शिरजोरी करणार नाही.

त्याचबरोबर निधन जर गावात झाले तर आत्मा गावकऱ्यांच्या पाठी लागू नये म्हणून शव मेलेल्यांसाठी खास बनवलेल्या घरामध्ये ठेवले जाते. माणसे काहीकाळ स्वतःवर प्रतिबंध ठेवतात आणि स्वतःच्या घरासमोर शेकोटी पेटवून ठेवतात.

जेव्हा एखादा माणूस मरणासक्त झाला असेल तर त्याला मरण घरात ठेवले जाते आणि दुष्ट आत्म्याची दूर राहावे म्हणून काही राक्षसी भूतबाधा नाहिशा करणाऱ्या झांडाच्या फांद्या त्याच्या बिछान्याभोवती ठेवतात.

अशा जगावेगळ्या पद्धतींशिवाय निकोबारी चालीरिती आणि संस्कृतीला तेथील कहाण्यांचा समुद्ध खजिना सधन करतो. कहाण्या आणि दंतकथा त्यांच्या वंशाचे मूळ शोधण्यापासून ते वटवाघूळ वा माशांच्या गोष्टी इथपर्यंत बदलत असतात. नारळाचे फळ त्या

बेटावर कसे अवतरले किंवा नवीन बेट कसे निर्माण झाली याची कथा नेहमी सांगितली जाते. काही कथा त्यांची जादू, विद्या, गूढता मंत तंत्र आणि मोहनी याभोवती विणलेल्या आहेत.

**ग्रहणाचे दिवस-**

निसर्गातील विलक्षण गोष्टी अतिशय महत्वाचा भाग झाल्या आहेत कारण लोक खूप धर्मभोळे आहेत. चंद्रग्रहण त्यांना अतिशय महत्वाचे वाटते आणि या गोष्टींवर ते चिनी लोकांप्रमाणे विश्वास ठेवतात. त्यांचा असा विश्वास आहे, की या ग्रहणाच्यावेळी चंद्राला एका प्रचंड सर्पाने गिळलेले आहे. आणि म्हणून संपूर्ण रात्रभर ते सर्पाला पळवून लावण्यासाठी टिनचे डबे जोराने वाजवितात आणि घोषणा करतात की, 'ए सर्पा, चंद्राला तू गिळू नकोस आणि आमच्यावर नाश ओढवू देऊ नकोस तो पूर्वीसारखा तेजस्वी आणि तेजोमय राहू दे.'

**होड्या-**

निकोबारींच्या आर्थिक व्यवहारात होड्या (निकोबारी भाषेमध्ये ॲप किंवा होरी) अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात. होड्या मोठ्या झाडाच्या खोडापासून बनवल्या जातात. ही झाडे दक्षिणेकडील बेटांवर आढळतात आणि चौवरामध्ये सापडत नाहीत. परंतु समुद्रात जाणाऱ्या मोठ्या होड्यांचा व्यवहार चौवरामधील दलालांमार्फत केला जातो.

निकोबारचे रहिवासी मातीची भांडी आणि होड्या यांच्या पुरवठ्यासाठी पूर्णपणे चौवरामधील लोकांवर अवलंबून राहतात कारण मातीची भांडी बनविण्याची कला फक्त त्यांनाच माहित आहे आणि होड्या चौवरामध्ये बनविल्या जात नाहीत. कारण होड्यांसाठी योग्य मोठी झाडे चौवरामध्ये आढळत नाहीत. होड्यांच्या व्यवहारात ते लोक दलाल म्हणून काम करतात. ते कामोर्टा, काचल, नांकोवरी अशा बेटामधून खूप कमी दरात होड्या खरेदी करतात आणि त्या निकोबारच्या लोकांना खूप चढत्या भावात विकतात. अशा प्रकारे होड्या व्यवहारात त्यांची पूर्णपणे मक्तेदारी आहे.

ही पद्धत अगदी अलिकडच्या काळापर्यंत चालू होती. जरी कार-निकोबारच्या लोकांना हे माहित होते की, चौवराच्या लोकांकडून ते लुबाडले जात आहेत तरी ते त्याविरुद्ध आवाज उठविण्यास असमर्थ होते. होड्या खरेदीच्या सुरुवातीला तर त्यांना एक मोठी मेजवानी आयोजित करावी लागे.

तथापि निकोबारी लोकांचे आयुष्य खूप मनोरंजक आहे. आधुनिकतेच्या प्रसाराचा जरी त्यांच्या आयुष्यावर मोठा प्रभाव पडला असला तरी अजूनही ते जुन्या समृद्ध आणि अलौकिक चालीरिती व संस्कृती टिकवून आहेत.

❑❑❑

# *निकोबारींच्या रुढी आणि उत्सव*

उत्तव हवा आणि मुबलक अन्न धान्य या मुख्य बाबींमुळे निकोबारी माणसे साधी व प्रामाणिक त्याचबरोबर समाधान प्रिय आणि धर्मभोळी अशी बनली आहेत. ते चिंतायुक्त आयुष्य जगतात आणि वर्षाचे अनेक दिवस करमणूक आणि हास्य विनोदात घालवितात. संपूर्ण वर्षभर ते सामाजिक आणि धार्मिक उत्सव साजरे करण्यात मशगुल राहतात. सामाजिक उत्सव ते मौज मजेसाठी करतात परंतु धार्मिक उत्सव हे भुतांना संतुष्ट करण्यासाठी असतात. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत निकोबारी लोक अनेक रूढी पाळतात आणि प्रत्येक प्रसंगासाठी एक उत्सव असतो आणि त्यात नृत्य, गाणे असते तसेच संपूर्ण वस्तीला मेजवानीचे जेवण असते.

**सामाजिक उत्सव : जन्म समारंभ :**

स्त्रियांच्या बाळंतपणाविषयी निकोबारी अतिशय धर्म भोळे आहेत. दांपत्याने पाळावयाची अनेक बंधने आहेत. बाळंतपणासाठी खास झोपडी बांधतात. या झोपडीला निकामायुआ अथवा चुक-ता कटापती असे म्हणतात आणि तिच्यावर जन्म झोपडी असे चिन्ह असते. ते जोडपे मूल होण्यापूर्वी काही आठवडे त्यात राहवयास जाते आणि माता पित्यानी तिथे पडून राहण्याची एक रुढी त्यांना पाळावी लागते. त्याकाळापुरते ते जोडपे कुठल्याही कठीण कामापासून दूर राहते. त्यांना कुठल्याही प्रकारची गाठ मारण्यास मनाई करण्यात येते. कारण अशी एक समजूत आहे की, त्या मुलाचा आत्मा त्यामुळे गर्भाशयामध्ये गुंतून जाईल आणि गर्भमुक्ती वेदनामय होईल.

जन्मानंतर सुद्धा त्या जोडप्याच्या हालचालींवर त्या नवीन जिवाच्या भल्यासाठी नियंत्रण ठेवले जाते. मुलाचे नाव ठेवल्यानंतर त्यांच्या रुढीप्रमाणे त्या भागातील स्त्रिया एकत्र जमतात आणि एका लहान भांड्यामध्ये अन्नाचे तुकडे टाकून शोक व्यक्त करतात. त्यानंतर त्या ते भांडे बुडवितात. त्यामागे अशी समजूत आहे की, त्यामुळे दृष्ट आत्मा दूर जाईल आणि नवीन जन्मलेल्या अर्भकाल दीर्घ आयुष्य लाभेल.

**विवाहसोहळा :-**

निकोबारी लोकांमध्ये विवाहप्रसंगी काही विशेष रुढी नसतात. मात्र चौवरा भागात विवाह थाटात होण्यासाठी काही विधी पाळले जातात. त्यांचा विवाह म्हणजे स्त्री प्रधान समाजाची वाढवलेली आवृत्ती असून त्यात मुलींना अनेक काळाच्या मनधरणी नंतर मुलाला स्वीकारण्याचे

वा नाकारण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. त्या भावी नवऱ्याला अनेक छळामधून जावे लागते. त्यामुळे होण्याऱ्या पत्नीची प्रेम याचना आणि वरचढ होणे त्याला करता येत नाही. मुलाचा धीटपणा आणि स्वार्थ त्याग याने प्रभावित होऊन ती मुलगी अभिमान सोडते आणि त्यांच्या प्रेमाचे रुपांतर विवाहात करून त्यासाठी मोठ्या खर्चाची मेजवानी देते.

विवाहानंतर नवरा मुलगा जर पत्नीच्या वडिलांच्या मागण्या पूर्ण करू शकला नाही तर तो पत्नीच्या कुटुंबाचा एक भाग बनून त्यांच्यात राहतो. विवाहनंतर जितकी अधिक संतती जन्मास येईल तितका तो विवाहसंबंध यशस्वी मानला जातो.

सर्वसाधारणपणे निकोबारी एक पत्नीव्रत पाळणारे आहेत आणि काही ठिकाणी एकाहून अधिक बायका केल्या जातात. अनेक नवरे करण्याची चाल तिथे पूर्णपणे ऐकिवात नाही. घर सोडून जाणे वा घटस्फोट घेणे ही बाब तिरस्करणीय मानली जात नाही. एखाद्या बाईने अनेक नवऱ्यांना सोडले असेल तर ती खचित बाणेदार मानली जाते.

**प्रेत संस्कार :**

प्रेत संस्कार विधी हा खूप महत्त्वाचा आणि श्रम कौशल्याची बाब म्हणून निकोबारींच्या जीवनात मानली जाते. मेलेल्या माणसाचे प्रेत घरात ठेवले जात नाही. कारण ते असे मानतात की, पिशाश्च प्रेताच्या साथीला येऊन संपूर्ण कुटुंबाला ते शाप देईल. सर्वसाधारणपणे मेलेला माणूस वा प्रेत हे मृतांसाठी असलेल्या घरात वा समुद्र किनाऱ्यावरील एल् पा नाम मध्ये ठेवले जाते. श्रमकौशल्यनिर्मित प्रेतसंस्कार पिशाश्च्यांना दूर राखण्यासाठी केले जातात.

मृत्यूची बातमी मिळाल्यानंतर अनेक मित्र आणि नातेवाईक सांत्वन करण्यासाठी एकत्र जमतात. ते आपल्याबरोबर दोन वार लांब असे सफेद सुती कापड त्या प्रेताभोवती गुंडाळण्यासाठी घेऊन येतात. पिशाच्याचे स्वागत करण्यास अटकाव म्हणून प्रेताचे डोळे बंद केले जातात. ते प्रेत नारळाच्या पाण्याने वा गरम पाण्याने धुतले जाते. त्यानंतर ते प्रेत लाल आणि सफेद कापडांनी बांधून पुरण्याच्या ठिकाणी नेले जाते.

प्रेताला पुरत असताना शोककऱ्यांच्या सावल्या थडग्यावर पडणार नाहीत याची काळजी घेतली जाते कारण सावल्यांमुळे भूत लपून राहील अशी शक्यता असते आणि म्हणून प्रेत पुरण्याचे काम सुर्योदयापूर्वी अथवा काळोखानंतर पार पाडले जाते. त्या मृत माणसाच्या सर्व वस्तु कपडे दागिने इ. त्या प्रेताच्या जवळ थडग्यात ठेवल्या जातात. हे पुनर्जन्म वा आत्म्याचे परतणे या विश्वासाकरिता नव्हे, तर भूताला खूष करण्यासाठी असते.

प्रेत पुरल्यानंतर 2 ते 3 वर्षांनी मृत माणसाची हाडे उकरून बाहेर काढणे आणि त्याची व्यवस्था करणे हा आणखी एक नाजूक कार्यक्रम करण्यात येतो. यावेळी जी मेजवानी दिली जाते. तिला लानिएत्ला असे म्हटले जाते मेजवानीनंतर मेलेल्या माणसाची हाडे थडग्यामधून काढून ती धुतली जातात आणि परत थडग्यात ठेवली जातात. कार निकोबारमध्ये प्रेताची हाडे ताम-नगी-कोणाह नावाच्या झुडुपात वा पुरण्याच्या जागेत टाकली जातात. मात्र इतर बेटांमध्ये डोक्याची कवटी आदर म्हणून ठेवली जाते. आणि इतर अवशेष एका पोकळ वस्तुमध्ये

वा ओंडक्यात ठेवले जातात. डोक्याची कवटी आणि हाडे अनेक पिढ्यान् पिढ्या कुटुंबाच्या पूजेसाठी राखली जातात. डोक्याची कवटी आणि हाडे थडग्यात ठेवल्यानंतर ओळख खूण म्हणून खुणेचा दगड त्यावर ठेवला जातो. त्यानंतर थडगे खणणारे समुद्रात आंघोळ करताता आणि ती रात्र अस्वच्छ अशा झोपडीत काढतात. त्यापूर्वी समाजाच्या सभागृहात जेवण करातात. दोन-तीन दिवसानंतर शेजारच्या गावाकडील सिद्ध पुरुषांना मेजवानीचे आमंत्रण धाडले जाते. भेटवस्तु देऊन त्यांचे स्वागत केले जाते. हा रुढी प्रकार भव्य मफाई नृत्य म्हणून ओळखला जातो. शेवटी याप्रसंगी कापलेल्या डुकराच्या जबड्यातील हाडे जमविली जातात आणि एका खांबाला बांधून ती समाजाच्या इमारतीत टांगली जातात. अशाप्रकारे निकोबारमधील सर्व समारंभ म्हणजे थडगे उकरण्याच्या वेळचे जेवण वा डुकरांची मेजवानी या अतिशय महत्त्वाच्या आणि खर्चिक असतात. मृत माणसाच्या सन्मानासाठी दिलेल्या मेजवानीला सुअरी म्हटले जाते आणि अशी मेजवानी प्रत्येक दुसऱ्या तिसऱ्या वर्षी सगळ्या गावात आळीपाळीने आयोजित केली जाते. हा भव्य समारंभ खूप थाटामाटाने व विधीपूर्वक केला जातो. या मेजवानीची वेळ गावातील प्रतिष्ठीत मंडळी ठरवितात.

**ॲप अथवा होरी :**

होडी मेजवानी (म्हणजेच ॲप) हा फार निकोबारचा एक महत्वाचा सामाजिक उत्सव मानला जातो. मेजवानीच्या दिवशी निकोबारी डुकराच्या मागे लागतात आणि डुकरे मारण्याचे कठिण काम करतात. त्यानंतर ते डुकराच्या उष्ण रक्ताने आपले शरीर माखवितात. होडी शुद्ध करण्याच्या समारंभात म्हणजेच होरी समारंभात नृत्ये व गाण्याचा एक कार्यक्रम असतो आमि त्यानंतर गावाला जेवणाची मेजवानी दिली जाते.

**ऐक्य मिलन :**

का-ना-हा-उन हा लोकप्रिय सामाजिक उत्सव कार-निकोबारमध्ये प्रत्येक गावात आलटून पालटून साजरा केला जातो. या लोक उत्सवामध्ये ऐक्याला उत्तेजन देण्यात येते. सर्व गावामधील माणसे यात भाग घेतात आणि प्रत्येकजण स्वतःबरोबर चमचे, बशा, पपया, याम, भाकर-फळे आणतात आणि यजमान-गावकरी मोठी मेजवानी देतात. पाहुण्यांचे स्वागत ताडाच्या झाडापासून बनवलेले ताडी हे पेय देऊन यजमान मंडळी करतात. सुपारी आणि मादक पानांपासून बनविलेली देशी सिगार त्यांना दिली जाते. रात्रीच्या जेवणानंतर नृत्ये गाणी आणि हास्य विनोदाचे कार्यक्रम केले जातात.

**धार्मिक उत्सव :**

आधुनिक निकोबारचा पिता बिशप जॉन रिचर्डसन च्या मताप्रमाणे निकोबारीना कुठला धर्म नाही, परंतु ते दृष्ट आत्मा आणि त्या आत्म्याच्या शक्तीला मानतात. या जगामध्ये जी काही दुःखे भोगावी लागतात ती सगळी दृष्ट आत्म्याकडून येतात. प्रारंभकाळी निकोबारमध्ये मंदिर नव्हते किंवा प्रार्थना करण्यासाठी कसले साधन नव्हते. तेव्हा परंपरेने आलेल्या रुढी पाळल्या जायच्या त्यात आत्म्याला खूष करण्यासाठी चेटकीणीद्वारे भूतबाधा नाहिशी करीत

असत. कारनिकोबारमध्ये टेचकीणीला टोटॅरंग म्हटले जाते तर चौवरामध्ये त्यांना कामासून म्हणतात. इतर काही ठिकाणी त्यांना मेनलुआना म्हणून ओळखले जाते आणि त्यांच्यात दृष्ट पिशाश्च्याला हुंगून शोधून काढण्याची शक्ती असते. अशी एक समजूत आही की, चेटकीणीद्वारे दःखी माणूस भूताशी संबंध जोडू शकतो आणि हाकलून देण्याचे काम करतो.

चौवरामधील लोक चेटुकगिरीत प्रसिद्ध आहेत आणि बेटावरील दुसऱ्या लोकांसाठी ते पाद्री म्हणून काम करतात. आणि धार्मिक विधीचे काम करतात. रुढीप्रमाणे प्रत्येक निकोबारी मुलाला चौवरामध्ये नेले जाते आणि मर्दपणाची दीक्षा दिली जाते. आरंभी आणि दिक्षा दिल्यानंतर पाद्री कोंबड्याचे रक्त त्या मुलाच्या सर्व अंगावर शिंपडतात त्यानंतर होडी स्पर्धा आयोजित केली जाते. कुजलेली अंडी मुलाच्या डोक्यावर फोडली जातात आणि एका दोरीत पांडानसचे बी ओवून ती माळ त्याच्या मानेभोवती गुंडाळली जाते.

आजकाल या धार्मिक रुढीपैकी अनेकबाबी तंतोतंत पाळल्या जातात असे नाही. परंतु विशेषतः चौवरामध्ये चेटकीणीचा प्रभाव अजूनही आहे कारण तिथली माणसे असे मानतात की, आजारी माणसाला ते बरे करू शकतात आणि दुष्ट पिशाश्चाला पळवू शकतात.कधी तरी अप्रामाणिक चेटकीणीच्या कामामुळे काही लोकांच्या हितास बाधा येते आणि याला प्रामाणिक चेटकीणीचा जादूटोणाच तोंड देऊ शकतो. पारंपारिक निकोबारी धर्म हा उघड शरीरधर्म म्हणून सांगितला जातो. त्यांच्यामते निसर्ग हे जमिनीवरील भूतांचे निवासस्थान आहे आणि त्यांची घरे त्यांच्या पूर्वजांच्या भूतांनी झपाटलेल्या जागा आहेत. दुष्ट भूताना 'इलि' म्हटले जाते तर चांगला भूताला 'इलि-का' असे म्हणण्यात येते.

दुष्ट पिशाश्च्याना जादूटोणा करून पळवून लावण्याबरोबर भूताला घाबरविण्यासाठी ते रंग लावतात वा झाडाच्या ओंडक्यापासून कोरीव काम करून माणसे पुराणातील प्राणी, पक्षी, मासे, मगरी, बोटी आणि शिड्या यांचे पुतळे करतात. ती पेंटिग्ज हेन्स म्हणून ओळखली जातात आणि लाकडातील कोरीव काम करून बनविलेल्या आकृत्यांना हेन्टा-कोई असे म्हणतात. लोकांच्या सर्वसाधारण श्रद्धांचा सन्मान म्हणून त्यांच्या महत्वाबरोबर ते छोटे पुतळे निकोबारी बोकांच्या कोरीव कामातील कौशल्याचे जिवंत पुरावे आहेत. प्रत्येक पुतळा एक निश्चित अर्थ व्यक्त करतो शिडी वातावरणातील दुष्ट आत्म्याच्या शोधाचे प्रतिक आहे तर होडीद्वारे त्यांचा किनाऱ्याच्या आजूबाजूचा शोध ध्वनित होतो.

आजकाल आधुनिक सुधारणांच्या आघातामुळे निकोबारमधील जीवन अनेक बदलांमधून गेले आहे. इस्लाम आणि खिश्चन धर्माच्या प्रभावामुळे त्या लोकांचा जुन्या निष्टांवरील विश्वास कमी होत चालला आहे. म्हणून हे स्वाभाविक आहे की, अनेक वर्षापासून चालत आलेल्या रूढी उत्सव त्यांच्या हृदय सिंहासनावर पूर्वीच्या कडक निष्टेनिशी हुकमत गाजवित नाहीत.

❑❑❑

# 1

# (लोककथा)


## *सूर्य आणि चंद्र यांची उत्पत्ति*

खूप खूप वर्षापूर्वी जग जेव्हा नवीन होते आणि आभाळ, पृथ्वी खूप खालती लोंबकळत होते, तेव्हा आज आपण जसे पाहतो तसे सूर्य, चंद्र अथवा स्वर्गीय दिव्य वस्तु तिथे नव्हत्या. याचा परिणाम म्हणजे पृथ्वी एक फसफसणाऱ्या ज्वालेची चेंडुसारखी वस्तु होती आणि तिचे तापमान प्रचंड होते. अति तीव्रतेच्या उष्णतेमुळे पृथ्वीवरील निरनिराळे भाग एकमेकाला चिकटून राहिले होते.

एके दिवशी पृथ्वीवर राहणारी जाणती माणसे एकत्र आली आणि पुढे काय करायचे याचा त्यांनी विचारविनिमय केला. खूपशा चर्चेनंतर त्यांनी काही जणांना लांबसर धनुष्य बनविण्यास आणि पोफळीच्या पानांचे दांडे आणि नारळीच्या पानांचे पेड यांच्यापासून बाण तयार करण्यास सांगितले

आभाळ खूप पाठीमागे सरकेपर्यंत त्यांनी त्याच्यावर बाणांचा वर्षाव केला. त्यांनी मारलेले काही बाण मागे परत आले नाहीत, तर तिथे अडकून राहिले. नारळीच्या पानांच्या पेडापासून बनलेल्या बाणांच्या ज्वाला होऊन स्फोट झाला आणि त्यातून हेनियन गाशिहेंग म्हणजे सूर्य निर्माण झाला. हा सूर्य आहे असा की, ज्याला मानवी चेहरा होता आणि त्याच्या आठ बाहूमधून त्याची मुले दिसत होती. पोफळीच्या पानांच्या दांड्यांपासून बाणांचा ज्वालांमध्ये स्फोट झाला नाही. मात्र त्यामधून हे नियन गाशि-काहे म्हणजेच चंद्र तयार झाला.

❑❑❑



# 2

# *निकोबारचे उगमस्थान*

एकदा त्या भागात महापूर आला होता आणि ते संपूर्ण बेट नष्ट झाले होते. सगळी माणसे पूरात बुडाली होती वा वाहून गेली होती. एक माणूस अगदी आश्चर्यकारकरित्या वाचला.

तो माणूस सुदैवी होता. तो पोहत एका उंच झाडापर्यंत पोचला. ते झाड पाण्यात पूर्णपणे बुडाले नव्हते. ते झाड एवढे प्रचंड आणि उंच होते की, वरचे टोक जणू आभाळाला स्पर्श करीत होते. तो माणूस त्या झाडावर चढला आणि पुराचे पाणी ओसरेपर्यंत तिथे ठाण मांडून बसला.

तो इतके दिवस अन्नाशिवाय जगला कसा ? तो जेव्हा कधी फुगलेल्या पोटाचे डुक्कर किंवा नारळ पाण्यावर वाहताना पाही तो झाडावरून खाली उतरे, त्या वस्तुंचा ताबा घेई आणि त्यावर तावा मारी.


शेवटी एकदाचा पाऊस थांबला आणि हळूहळू पाणी मागे हटू लागले. शेवटी जमिन दिसू लागली आणि तो झाडावरून खाली उतरला.

जेव्हा पाणी पूर्णपणे हटले. एक कुत्री त्याच्या दृष्टीस पडली. या कुत्रीचे कान ताडाच्या झाडाच्या एका मोठ्या काट्यामध्ये अडकले होते. तो माणूस वर गेला आणि त्याने तिचे कान काट्यामधून मोकळे केले आणि तिला खाली आणले.

त्या प्राण्याचे सौंदर्य पाहून तो हरखून गेला आणि त्याने तिला आपली बायको करायचा ताबडतोब निर्णय घेतला. ते दोघे पुरुष आणि स्त्री प्रमाणे अतिशय सुखात राहिले आणि त्यांना झालेले मुले मानवी रुपातील संतती होती.

एका म्हणीप्रमाणे, अशाप्रकारे निकोबारची संतान पृथ्वीतलावर अवतरली. निकोबारची माणसे लुंगी (की-सॅट) नेसतात. त्याचे कारणही असेच आहे. यामध्ये कुत्र्याप्रमाणे एक शेपूट पाठीमागे लटकत असते. तसेच पुरुष घालत असलेल्या पागोट्यामध्ये (टा-चोकला) दोन शिंगे असतात. ते हा पोशाख पूर्वज आईच्या कानाशी सांकेतिक असा समजतात. तसेच ते डोक्याखाली वापरत असलेल्या सालीलादेखील कुत्र्यासारखे उभे राहणारे दोन कान असतात.

❑❑❑



# 3

# *अति उंच आणि बुटके*

खूप खूप वर्षापूर्वी जेव्हा सर्व बेटे रिकामी होती आणि सगळीकडे फक्त प्राणी फिरताना दिसत, तेव्हा सूर्य आणि चंद्र सर्वकाळ दिसत. पक्षी खिस नि रात्र चिवचिव करीत, फुले कधीच कोमेजत नव्हती, वनदेवी आनंदाने नृत्ये करायच्या आणि मधुर स्वरात गाणी गायच्या. एकदा खूप दाढी वाढलेला आणि केस पिंजारलेला एक अनोळखी माणूस तिथे आला. त्याने लांब शेपटी असलेली लुंगी घातली होती आणि डोक्यात कुत्र्याच्या कानवाली टोपी घातली होती. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्याने तो समुद्र किनाऱ्यावर येऊन पडला. तो अतिशय थकला होता. दमला होता आणि ताबडतोब झोपी गेला.

झोपेमध्ये असताना त्याला आपल्या कानपुड्यांमध्ये काहीतरी हलल्यासारखे वाटले. कसले तरी स्वप्न पडले असावे या समजूतीने तो परत झोपी गेला. परंतु नाही, त्याला परत झोप येणे शक्य नव्हते. त्याला आपल्या संपूर्ण शरीरभर काहीतरी गुदगुदल्या केल्यासारखे वाटले. त्रासाने संतापून त्याने डोळे उघडले आणि तो आश्चर्यचकित झाला. काही छोटे प्राणी सगळीकडे फिरताना त्याला दिसले. आश्चर्याने विस्मित झालेल्या त्याला जेव्हा कळले की ते मुंग्यांएवढे छोटे प्राणी म्हणजे दुसरे कुणी नसून बुटके आहेत आणि त्यांच्यापुढे तो अतिप्रचंड आहे. तेव्हा त्याला खूप आनंद झाला. ते बुटके अतिशय आनंदी आणि उत्साही होते. त्याने काही हालचाल केल्यानंतर ते प्राणी घाबरले आणि झाडांच्या मुळांशी आणि फांद्यामागे जाऊन लपून बसले. त्यांची भीती घालविण्यासाठी त्याने झोपेचे सोंग घेतले.

काही वेळानंतर त्या बुटक्यांनी झुडपांमागून डोकावून पाहिले आणि जेव्हा तो उंच प्राणी झोपल्याचे दिसले तेव्हा ते बाहेर आले. काही वेळात त्यांची काळजी दूर झाली. त्यांच्यापैकी काहीनी त्याच्याजवळ जाण्याची हिमंत केली आणि त्याच्या शरीराचा गंध घेण्यासाठी ते शरीराला लोंबकळत राहिले. त्यानंतर त्यांनी आनंदाचा घोष केला आणि नृत्य करायला आणि गायला सुरुवात केली. उंच प्राणी आश्चर्यचकित झाला. तो उठून बसला आणि तरी ते घाबरले नाहीत. त्याला काही कळेना की, बुटक्याना एवढा आनंद व्हायला काय कारण घडले असावे? त्यांनी आनंद व्यक्त करण्यासाठी त्याला स्पर्श केला आणि कुरवाळले. तसेच सांकेतिक भाषेमधून तो उंच प्राणी त्यांचा मित्र आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला कारण त्याच्या शरीरामधून फुलांचा सुंगध बाहेर येत होता.



अशाप्रकारे त्या उंच माणसाला बुटक्यांचा सलगीतील कळकळ जाणवली आणि तो त्यांचा मित्र बनला. त्याने त्यांना त्यांचे पूर्णपणे समाधान होईल एवढे नारळाच्या फुलांचे गोड पेय पाजले आणि हिरव्या नारळातील पाणी त्यांची हृदये शांत होतील इतके दिले. त्या प्रत्येकाची माणूस म्हणून पूर्ण वाढ होईपर्यंत त्यांची काळजी घेतली. त्यांनी सुद्धा रोपटी कशी वाढवावीत आणि डुकरांचे पालनपोषण कसे करते ते शिकून घेतले. ते स्वावलंबी बनल्यावर तो अनोळखी माणूस अदृश्य झाला.

काही काळ गेल्यानंतर ते संपूर्ण बेट ताड व माड यांचे उपवन बनले आणि तेथील जीवन अतिशय शांतता आणि स्वस्थता यांनी भरून गेले असे मानले जाते की ही माणसे निकोबारीज् यांचे पूर्वज होत.

❑❑❑

# 4

# *एक माणूस अजगर झाला त्याची गोष्ट*

खूप खूप वर्षापूर्वी काही माणसे त्यांच्या वार्षिक महोत्सवासाठी (कुन येनसे) लागणारी फळे आणि भाजी काढण्यासाठी अरण्यात गेली होती.

परतीच्या मार्गावर जंगलातून मार्गक्रमण करताना त्यांना तहान लागली आणि ते सर्वजण नारळाचे पाणी पिण्यासाठी थांबले.

त्यांच्यातील एकजण झाडावर चढला आणि त्याने नारळ काढून ते खाली टाकले. तहान पूर्णपणे शमेपर्यंत ते भरपूर नारळ-पाणी प्यायले.

नारळ काढण्यासाठी वर चढलेला माणूस बराच वेळेपर्यंत जेव्हा खाली उतरला नाही, तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांना काळजी वाटली. त्यांनी त्याला हाक मारली 'ताबडतोब खाली ये. आपल्याला ताबडतोब निघायचे आहे.'

वर चढलेला माणूस उतरला, 'तुम्ही सगळे घरी जा मी परवापर्यंत घरी येणार नाही.' अशाप्रकारे ते सगळे त्याला जंगलात सोडून आपल्या घरी परतले.

काही काळ त्यांने अतिशय चिंतामुक्त आणि बिनधास्त असले आयुष्य भोगले. त्याला आपल्या पोटाभोवती चरबी वाढवून खूप मोठे पोट असलेला ढेरपोट्या व्हायचे होते म्हणून गोडपेय आणि नारळाच्या झाडाची कोवळी पाने खाऊन तो राहू लागला.

लवकरच त्याच्या पोटाभोवती चरबी खूप वाढली. परंतु इवि नावांच्या पिशाच्चाने केलेल्या जादूने त्याचा एका अजगरात बदल झाला. दुसऱ्या दिवशी बाजूच्या खेडेगावातील एक बाई झाडाच्या चिकामधून तंतुमय पदार्थ काढीत होती. तेव्हा नागमोडी चालणारा आडदांड तिच्या नजरेस पडला. त्याच्या शेपटांमुळे तिच्या तो लक्षात आला. त्याचे स्वरुप काय भयंकर होते ! तो आता मानवी शरीरधारी राहिला नव्हता तर अजगर झाला होता. सगळ्या माणसांनी भीती आणि उरात धस्स झाल्याने किंकाळ्या ठोकल्या.

तो पिशाच्च वा दुष्ट आत्मा असेल या विचाराने त्या सर्वांनी पळून जाण्यासाठी घरातून उड्या मारल्या परंतु दुर्दैवाने ते थेट अजगराच्या तोंडात जाऊन पडले आणि त्याने त्यांना गिळून टाकले. पुढे पडलेली गोष्ट खूप मनोरंजक होती.

अजगराच्या पोटात अडकलेल्या स्त्रियांच्या हातात स्वयंपाक घरातील मोठे चाकू होते. त्या चाकूनी त्या अजगराचे पोट फाडून त्या स्त्रिया बाहेर आल्या.



तिथे उभे असलेल्या लोकांनी जेव्हा हे पाहिले, त्या सर्वांचा भयाने थरकाप उडाला आणि त्यानी भीतीनी आरोळ्या ठोकल्या. जीवाची काळजी करीत ते सगळे तिथून पळाले. शेवटी जखमी झालेला आणि घाबरलेला तो अजगर जंगलात गेला आणि दृष्टीआड झाला.

आताशा त्या अजगराचे एकच काम असते आणि ते म्हणजे सूर्य आणि चंद्र यांना अधूनमधून गिळणे. यामुळे सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण होत असतात आणि माणसे अजूनही त्या अजगराला घाबरत असतात. कारण त्यांना त्याची ती जुनी त्रासदायक गोष्ट आठवत असते.

❑❑❑

5

# *कार-निकोबारची उत्पत्ति*

खूप खूप वर्षापूर्वी अगदी प्राचीन काळी टॉट-टा-रँग नांवाचा एक माणूस होता. तो पू नांवाच्या एका दूरच्या बेटावर राहत होता. त्याच्या गावामध्ये एक सुंदर तरुणी होती. तो तिच्यावर जीवापाड प्रेम करीत होता आणि तिला आपली पत्नी बनविण्यास उत्सुक होता. तो एक दिवस तिच्याकडे गेला आणि तिच्याकडे आपले प्रेम व्यक्त केले; नि तिच्याशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु तिने त्याला कुठलाच प्रतिसाद दिला नाही. परत परत तो तिचे मन वळविण्याचा प्रयत्न करी परंतु ती मुलगी आपल्या निर्णयापासून जरासुद्धा ढळली नाही. अतिशय निराश होऊन त्याने आपले आयुष्य संपविण्याचे ठरविले.

त्या खेड्यामध्ये साजऱ्या होणाऱ्या ऑसुअटी वार्षिकोत्सवाचे ते दिवस होते आणि त्याप्रसंगी आजूबाजूच्या खेड्यामधील हजारो माणसे एकत्र जमा झाली होती. त्यांनी बरोबर डुकरे आणली होती आणि त्यांना मेजवाणीसाठी कापले जाणार होते.


टॉट-टा-रँगसुद्धा तिथे गेला आणि त्याने लोकांना डुकरे नेतांना पाहिले. ती माणसे इतकी आनंदी आणि हसतमुख होती की त्याने कुणाच्याही मनातील दुःख हद्दपार व्हावे. परंतु टॉट-टा-रँगला त्याचा आनंद झाला नाही. उलट त्याच्या गहिऱ्या दुःखामुळे त्याला त्यांचा तिरस्कार वाटला आणि तो त्या मौजेच्या दृश्याकडे पाहू ही शकला नाही.

त्या गर्दीमध्ये त्याचे सांत्वन करण्यास कुणी नव्हते. कारण त्याचे मित्र तर आपल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात गुंतले होते.त्याला त्यावेळी एवढे एकाकी आणि दुःखी वाटले की त्याने स्वतःबरोबर त्या तरुणीचाही अंत करण्याचे ठरविले.

'तथापि शेवटचा प्रयत्न म्हणून मी तिच्याकडे जाईन आणि तिला पटवून देईन' त्याने स्वतःशी म्हटले. तो त्या तरुणीकडे गेला आणि तिचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने त्याच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही.

अतिशय निराश होऊन त्याने ठरविल्याप्रमाणे कृती करायचे ठरविले तो घरी गेला आणि त्याने एक मोठी तलवार काढली आणि ती घेऊन तो जंगलात गेला. त्या बेटाचा वायव्य (उत्तर-पश्चिम) आणि ईशान्य (उत्तर-पूर्व) अशा दोन भागात तुकडे करण्याचा त्याचा हेतु होता कारण वायव्य भागात ती तरुणी राहत होती तर ईशान्य भागात मेजवाणीसाठी तो जमाव जमला होता.

117508.





त्याने डोंगर चढण्यास सुरुवात केली आणि शेवटी तो भेगेच्या डोंगरा(क्लेफ हिल)पर्यंत पोचला. नाचणांऱ्यामधून तो दगडावर चढला. टॉट-टा-रँगने आपली तलवार काढली आणि त्याने त्या जमिनीचे दोन तुकडे करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याने आपल्या तलवारीचे टोक जमिनीवर टेकविले तरी जमिन दुभंगली नाही. म्हणून त्याने टा-चोई झाडाचा एक तुकडा घेतला आणि त्याच्या नरम भागापासून एक तलवार तयार केली. त्याने ती दाहसारखी बनविली आणि तिच्या टोकाने जमिनीवर खुणेची एक रेषा आखली. आश्चर्य त्या लाकडी तलवारीच्या तीक्ष्ण टोकाने ती जमिन वेगळी होऊ लागली होती. टॉट-टा-रँगने मूस ते पासा या किनारपट्टी दरम्यानची जमिन कापण्यास सुरुवात केली.

जेव्हा त्या मैदानाला भेगापडून असे तुकडे पडू लागले होते, टॉट-टा-रॉंग द्विधा मनःस्थितीत पडला. ज्या जमिनीवर तो पाय रोवून उभा होता तिथे राहावे की, जो भाग दूर जात होतो तिकडे जावे याचा निर्णय होत नव्हता. शेवटी त्याने त्या वेगळ्या झालेल्या दुसऱ्या भागात उडी मारून जायचे ठरविले. परंतु एव्हाना मोठे भगदाड पडले होते आणि त्याने नवीन तयार झालेल्या बेटावर उडी मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याचा तोल गेला आणि तो त्या दोन भागांच्या मध्ये पडला.

दरम्यान त्या बेटाच्या जो भाग दूर जात होता, त्याने वेगळा विचार केला आणि बेटाच्या मूळा भागाशी येऊन मिळावे असे ठरविले. अशा तऱ्हेने टॉट-टॉ-रँग हा दोन भागांच्यामध्ये चिरडला गेला.

जेव्हा त्या जमिनीच्या भागाने टॉट-टा-रँगचे रुप पाहिले; तेव्हा त्यालाही हे दृश्य पाहून दुर्मुखल्यासारखे झाले आणि तो भाग तिटकाऱ्याने पाठीमागे सरला. आता टॉट-टारँगचे शरीर खडकात बदलले होते. देवदार झाडाची पाने किनाऱ्यावर विखरून नाश पावत होती, ती त्याच्या विखुरलेल्या केसांचे प्रतिक होती.

जो भाग जमिनीपासून वेगळा झाला होता, तो आताचे छोटे अंदमान बेट होय आणि राहिलेला भाग आताचे कार निकोबार बेट म्हणून निर्माण झाले.

टॉट-टा-रँगचा भटकता आत्मा त्या दोन बेटामध्ये वावरत असतो. या टेन डिग्री चॅनेल म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रदेशाभोवतीच्या समुद्रामध्ये ती चंचलता उतरली असून काही वेळा त्याच्या विक्राळपणाचा तडाखा मोठ्या जहाजांनाही बसत असतो.

❑❑❑

# 6

# नारळाच्या झाडाची गोष्ट

कोणे एके काळी असुंगी तोसुंग आणि यानालो हे दोन मित्र कार निकोबार बेटाच्या दक्षिणकडील पश्चिम किनाऱ्यावर राहत होते. इथे फार कमी माणसे वस्ती करून राहत होते. त्यामुळे हा भाग अतिशय एकाकी आणि भेसूर म्हणून प्रसिद्ध होता. दोन मित्र राहत असलेल्या भागाला इल्का होरो म्हटले जायचे.

त्या दिवसामध्ये संपूर्ण बेट उंच गवतांनी व्यापून गेले होते. नारळाचे झाड तोपर्यंत कार निकोबारमध्ये कुठेही आढळले नव्हते आणि कुणालाही त्याच्या अस्तित्वाची माहिती नव्हती. त्यावेळी कुठे पाण्याचे झरे वा विहीरी नव्हत्या त्या बेटाच्या भोवती पसरलेल्या अवाढव्य समुद्राशिवाय पाण्याचा कुठे मागमूस नव्हता. पिण्याचे पाणी नसल्यामुळे माणसे बऱ्याचवेळा मृत्यूमुखी पडत.

असुंगी तो सुंग याच्याकडे वेगळी शक्ति होती. तो मोठ्या धार्मिक उत्सवांमध्ये आपल्या जादूच्या करामतीने लोकांची करमणूक करीत असे. कधी तर तो आपली तहान भागविण्यासाठी आपल्या कोपरामधून शुद्ध पाणी काढीत असे. तथापि त्याच्या मित्राला त्याच्याकडील जादूच्या शक्तीची कल्पना नव्हती.

एक दिवशी त्या दोघा मित्रांनी ठरविले की, आपल्या घराभोवती वाढलेल्या गर्द झाडांचे अरण्य साफ करायचे. काम सुरू करण्यापूर्वी त्यांनी आपली मोठी कोयती धार लावण्याच्या यंत्रावर तीक्ष्ण करण्यास घेतली. या कामासाठी पाणी आवश्यक होते. 'पण यासाठी पाणी मिळणार कुठून ?'यानालो उद्‌गारला. 'त्याची व्यवस्था मी करतो' असुंगी तो संग उत्तरला. तो एका झुडुपामागे गेला आणि त्याने आपली गुप्त गोष्ट मित्राला कळू न देण्याची काळजी घेतली. त्यानंतर तो पाण्यांनी भरलेला एक पेला घेऊन परत आला आणि आपल्या कोयत्याला धार लावण्यास सुरुवात केली. त्याने काम पूर्ण केल्यानंतर यानालोने मित्राकडे पाणी कुठे सापडले म्हणून विचारणा केली. पण असुंगी तोसंगने आपली गुप्त गोष्ट सांगण्यास नकार दिला. उत्सुकता वाढल्यामुळे यानालोने त्याला परतपरत विचारले तरी त्याचा काही परिणाम झाला नाही. शेवटी मित्र काहीही सांगण्यास तयार होईना तेव्हा यानालोला खूप राग आला. त्याने आपल्याकडील धारधार कोयता बाहेर काढला आणि क्षणात आपल्या मित्राचे शीर धडापासून वेगळे केले.



त्याने आपल्या मित्राचे शरीर बरोबर घेतले आणि त्याला मातीत पुरले. मात्र त्याचे शीर न पुरता ते आपल्या झोपडीमध्ये ठेवले जरी शीर शरीरापासून वेगळे झाले होते, तरी ते यानालोजवळ बोलत असे. आता यानालो घाबरला आणि त्याने शीरसुद्धा मातीत पुरले. एका महिन्यामध्ये असुंगीच्या शीर पुरलेल्या जागी एक कोवळा वृक्ष उगवला.

काही दिवसानंतर यानालोला एकाकी राटू लागले आणि तो पूर्व किनारपट्टीवर आला आणि तिथेच वस्ती करून राहिला. काही काळानंतर त्याने लग्न केले आणि त्याला एक कन्या रत्न झाले.इल्काहोरो या आपल्या मूळच्या वस्तीपासून सहा वर्षे दूर राहिल्यानंतर त्याला त्या भागाला भेट द्यावेसे वाटले. आपली बायको आणि मुलगी यांना बरोबर घेऊन तो इल्का होरोला आला.

नवीन भागाचे वातावरण त्याच्या छोट्या मुलीला मानवले नाही आणि ती गंभीर आजारी पडली. तिथे कुठे पाणी नसल्यामुळे ती तहानेने व्याकूळ झाली. पाण्यासाठी भटकत असतात यानालोला एक वेगळे झाड दिसले. या झाडाची फळे मानवी कवटीसारखी दिसत होती. जेव्हा त्याने ते टणक फळ तोडले तेव्हा त्याला त्यात भरपूर पाणी आढळले परंतु चाखल्यानंतर त्याची चव रक्तासारखी आढळबी. 'काही असले तरी माझ्या मुलीची तहान याने भागेल.' यानालोने विचार केला. त्याने ते फळ आपल्या मुलीला पिण्यासाठी दिले. आश्चर्य म्हणजे त्याची मुलगी त्यानंतर आजारातून ताबडतोब बरी झाली. 'हे खरंच आश्चर्यकारक आहे.' यानालो अचंबित होत म्हणाला. 'माणसाच्या कवटीसारखे हे फळ आहे. ही कवटी माझा मित्र असुंगी तोसुंग याची असावी.'

हळुहळु कार निकोबार बेटावर नारळाच्या झाडांची संख्या वाढली आज तेव्हा केव्हा या बेटावरील माणसे नारळाचे पाणी पितात तेव्हा त्यांना असुंगी तोसुंगची आठवण होते.

कार निकोबारमध्ये नारळाचे झाड आल्याचे मूळ या दंतकथेत आहे.

❑❑❑

## 7

# वटवाघुळाचे मूळ


खूप खूप वर्षापूर्वी कार-निकोबार बेटावर वटवाघुळे नव्हती. एके दिवशी परदेशातून तिथे एक जहाज आले आणि ते सरळ कार निकोबारच्या पश्चिम किनारपट्टीवरील अरोंग या गावाकडे वळले. परंतु वादळी समुद्र आणि वेगवान वारे यामुळे ते जहाज भरकटले. अरोंगच्या अरुंद बंदरामुळे ते खडकावर आदळले आणि त्याचा पूर्ण चक्काचूर झाला.


जहाजावरील बहुतेक खलाशांना आणि प्रवाशांना जलसमाधी मिळाली. त्यातील खूप थोडे ज्यांना पोहता येत होते ते वाचले. त्यांनी जेव्हा त्या भागात अन्नासाठी पाऊल टाकले तेव्हा अजानतेपणी त्यांची टक्कर निषिद्ध जमिनीशी म्हणजेच पिशाश्च्यांच्या प्रदेशाशी झाली.

त्या लोकांची मनःस्थिती चांगली नव्हती, कपडे फाटके तुटके आणि जिर्ण होते तरीसुद्धा ते झाडांच्या पारंब्याना झोके देऊन आणि झाडांना उलटे लटकून डोके खाली करून स्वतःचे मनोरंजन करीत राहिले. त्या पिशाश्च्यांनी त्या लोकांचे हे मस्त झोके घेणे आणि फिदी फिदी हसणे एवढे मस्त अनुभवले की त्यांनी त्या खलाशांचे वटवाघुळात रुपांतर केले अंगाने जाडसर असलेल्यांना त्यांनी मोठ्या प्रकारच्या वटवाघुळात रुपांतर केले. जे जास्त जाड नव्हते त्यांना मध्यम प्रतीच्या रक्तशोषक वटवाघुळे म्हणून बनविले आणि छोट्या मुलांचा उंदीर वटवाघुळात पालट केला. आजही ते सर्वजण झाडांच्या फांद्याना आपल्या पंज्यानी पकडून उलटे लटकून राहत असतात.

अशाप्रकारे कार निकोबार बेटावर प्रथम वटवाघुळे आली.

❑❑❑





# 8

# *शार्क माशाचे मूळ*

कोणे एके काळी काही दुष्ट बुद्धीचे लोक तमालु आणि पूको या बेटाच्या मधील तरूलो या भागात राहत होते. ती माणसे क्रूर आणि जंगली होती. त्यांनी त्या भागातील लोकांवर जादूटोणा केला होता. एकूण त्या लोकांवर अत्याचार करून त्यांनी त्यांनी गुलाम करून टाकले होते.

काही काळानंतर ती स्थानीक माणसे त्या जंगली माणसांविरुद्ध बंड करून उठली. त्यांनी अनेकांना ठार मारले आणि राहिलेल्या काहिना त्या बेटाच्या अगदी दूरच्या भागात म्हणजे चौक्रौक नावाच्या प्रदेशात आणून सोडले. हा प्रदेश टिटॉप बेटापासून फार दूर नव्हता. इथे त्या रानटी माणसाने स्वतःसाठी घरे बांधली. परिणामतः ती माणसे अधिक क्रुर आणि सूड घेणारी अशी बनली. त्यांनी सतत स्थानिक लोकांवर तुटून पडून बदला घेण्याचा विचार केला. जेव्हा कुणी त्यांच्या दृष्टीस पडे ते त्याचा बळी घेत

एके दिवशी दोन लहान मुले एल-पा-नामला चालली होती. त्यातील मोठ्या मुलाने लहान भावाला खांद्यावर घेतले होते. तीक्ष्ण भाला घेतलेला एक रानटी माणूस आपल्या मागे येत असल्याचे त्यांनी काही पाहिले नाही.

काहीच वेळात त्या माणसाने छोट्या मुलाला पृष्ठभागावर तीक्ष्ण हत्यारान भोसकले. तो छोटा मुलगा ओरडला, 'मी जखमी झालोय.' यावर तो मोठा त्या नवागताला म्हणाला, 'कृपा करून माझ्या भावाला सतावू नकोस नाहीतर तो हालचाल करेल आणि खाली पडेल.' आपला भाऊ भोसकून जखमी झालाय हे त्याला समजले नाही. त्याला असे वाटले की तो माणूस आपल्या भावाला गुदगुल्या करीत असावा तेव्हा तो पुन्हा ओरडला, 'माझ्या भावाला सतावू नकोस.'

परंतु त्या माणसाने त्या मुलाला बाहुखाली परत एकदा भोसकले आता जखमेतून रक्त जोराने बाहेर आले आणि लहान मुलगा मरून खाली पडला. मोठा भाऊ या दृश्याने स्तंभित झाला.

जेव्हा त्या मोठ्या मुलाने पाहिले की, आपला लहान भाऊ मरून पडला आहे. तो खूप घाबरला आणि पाय जेवढ्या वेगाने धावतील तेवढे धावून तो तिथून निसटला. त्या क्रूर माणसाच्या भीतीमुळे त्याने आपल्या मेलेल्या भावाला तिथेच सोडले. घरी पोचल्यानंतर त्याने



आई-वडिलांना काय घडले ते सांगितले.

त्या लहान मुलाच्या क्रूर हत्येने त्या भागातील साऱ्या जणांना क्रोध झाला. त्यांची बैठक घेतली आणि बेटावरील सगळ्या रानटी माणसांना नष्ट करण्याचे ठरविले. त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी त्यांनी स्वतःची एक मोठी फौज तयार केली आणि शेवटी बडतेकांना ठार मारले. मात्र त्यापैकी काहीजण खोल समुद्रात जाऊन निसटण्यात यशस्वी झाले. जेव्हा त्या रानटी लोकांच्या हे ध्यानात आले की, त्यांचा आता नाश अटळ आहे तेव्हा त्यांनी जादूटोणा करून स्वतःचे रुपांतर शार्क माशात करून घेतले आणि मरणापासून सुटका करून घेतली.

आणि म्हणून त्या संपूर्ण किनारपट्टीवर माणसाला खाणारे शार्क मासे आढळतात.

❑❑❑

9

# छोट्या समूहाचे सामर्थ्य

कोणे एके काळी मलाक्का बेटावरील काही माणसे जादूशक्तीच्या बळावर जमिनीतील एका छोट्या भोकातून तळाच्या दुसऱ्या जगात गेले. तो भाग एवढा अंधकारमय आणि घाणीचा होता की, त्यांना नारळाच्या पानांपासून मशाली करून आपला मार्ग शोधावा लागला.


एके दिवशी अशा एका भेटीत त्यांना काही अंडी आढळली आणि विचाराअंती ती तिथे वसती करून असलेल्या छोट्या नर्तकांची असल्याची त्यांची खात्री पटली. त्या वेळेपासून ते नियमितपणे ती अंडी चोरू लागले.

एके दिवशी ते छोट्या नर्तकांच्या समोरासमोर आले. तेव्हा मलाक्काच्या लोकांनी त्यांना विचारले की, त्यांचे आई-वडिल कुठे आहेत तर त्यावर ते उत्तरले की, आम्हीच प्रौढ नर्तक आहोत. त्या पाहुण्यांवर छाप पाडण्यासाठी त्यांनी त्यांना नृत्यस्पर्धेचे आव्हान दिले आणि त्यात एक अट टाकली की, जर वरच्या जगातून येणारी माणसे ही स्पर्धा हरले तर ते परत खालच्या प्रदेशात अंडी चोरण्यासाठी येणार नाहीत. मलाक्काची माणसे कबूल झाली आणि नृत्य स्पर्धा सुरू झाली ते छोटे नर्तक नृत्यामध्ये मलाक्काच्या मंडळीपेक्षा वरचढ ठरले आणि ते विजेते म्हणून जाहीर करण्यात आले.

अशा तऱ्हेने वरच्या जगातील लोकांना छोट्या नर्तकांकडून मान खंडना आणि मानहानी पत्करावी लागली. या लोकांची नेहमी मानखंडना आणि मजा करीत आले होते. त्यानंतर मलाक्काच्या लोकांनी खालच्या जगात जाऊन अंड्याची चोरी करता आली नाही, कारण त्या छोट्या मंडळीनी तो मार्ग सुपारी फळांनी बंद केला होता, ज्याचे पुढे दगडात रुपांतर झाले आणि त्याचे त्यांच्यापुढे मोठे आव्हान उभे झाले.

अशाप्रकारे मलाक्काची माणसे खालच्या जगात जायची पूर्णपणे थांबली.

❑❑❑



# 10

# *चौवरा बेटाचा शोध*

खूप खूप वर्षापूर्वी त्या बेटावरील लोक याबाबतीत अनभिज्ञ होते की, आपल्या बेटाखेरीज जगात इतरही कुठे वस्ती असेल. कारण त्यांचा असा समज होता की, महासागराच्या मध्यभागी ते वस्ती करून आहेत.

एकदा असे घडले की, त्यांच्यापैकी काहीनी नारळाच्या पोयींपासून लहान होडी बनवली. तिच्यावर चांगला हात फिरवला आणि त्यावर एक शीडही लावले. त्यांनी होडीमध्ये रताळ्याचे एक छोटे पोते टाकले आणि ती होडी वाऱ्याच्या दिशेने सोडली.


काही महिन्यानंतर ती लहान होडी तोपर्यंत अज्ञात असलेल्या चौवरा या बेटावर जाऊन पोचली. चौवरामधील कुणालातरी ती आढळली आणि त्याने ती इतरांना दाखवण्यास नेली.


चौवराच्या रहिवाशांनी जेव्हा ती होडी पाहिली तेव्हा ते म्हणाले, कदाचित आजूबाजूला कुठे तरी एक लहान देश असावा आणि ही लहान होडी बनवून आणि त्यात रताळ्याचे पोते भरून त्या लोकांनी पाठविलेले असावे. चला, आपणही त्यांना जेवण बनविण्याचे छोटे भांडे आणि कुई लोई पदार्थ (नारळाचे खोबरे, केळी आणि रताळी यापासून बनवलेला पदार्थ) देऊ या.

अशा प्रकारे ती छोटी होडी परत त्या देशाच्या दिशेने पाठविण्यात आली आणि ती छोटे जेवणाचे भांडे आणि कुई लोई पदार्थासह योग्य स्थळी पोचली. त्या बेटावरील लोकांनी त्या होडीचा ताबा घेतला आणि त्यावरील भेटीचे पोते ताब्यात घेतले.

त्या भांड्याचे निरीक्षण करणाऱ्या अनेकांपैकी एकजण म्हणाला, आपण या भांड्याचे काय करायचे ? आपले जेवण करताना पाणी तापवण्यासाठी त्याचा उपयोग होईल म्हणून त्यांनी त्यामध्ये थोडे पाणी ओतले आणि ते भांडे विस्तवावर ठेवले. विस्तवाने ते भांडे तडकले नाही त्याला छिद्र पडले नाही. या गोष्टीचे त्यांना आश्चर्य वाटले. त्यानंतर त्यांनी त्यात थोडे अन्न टाकले आणि ते पाण्यामध्ये शिजवले.

त्या भांड्याच्या जादूने चकित झालेले ते एकमेकांना म्हणाले, 'कदाचित यापेक्षाही मोठे भांडे असेल. हे छोटे स्वयंपाकाचे भांडे कुठून आले काही कळत नाही आपण छोट्या होडीतून जाऊ या आणि शोध घेऊ या. कारण आपल्याला स्वयंपाकाच्या भांड्याची अत्यंत गरज आहे.'





अशाप्रकारे काही काळानंतर त्या माणसांनी छोटी होडी पाण्यात सोडली आणि त्या मागून त्यांच्याही होड्या सोडल्या, जेणेकरून ते त्या बेटावर पोहचू शकतील परंतु वाटेत ते मार्ग चुकले आणि त्यांच्या होड्या जशा लुरू बेटाकडे वळत होत्या तेव्हा चौवराच्या लोकांनी त्यांना पाहिले आणि त्यांना खुणा करून समुद्र काठावर बोलावले. त्या बेटावर पाऊल ठेवता क्षणीच छानदार आणि कठीण अशी भली मोठी जेवणाची भांडी पाहून ते सर्व आश्चर्यचकित झाले. ताबडतोब त्यांनी आपल्याकडील माल देऊन वस्तूंची अदलाबदल केली.

त्यानंतर कार निकोबारची माणसे चौवरा बेटावरील लोकांचे चांगले मित्र बनले आणि ते आपल्याकडील माल देऊन चौवराच्या लोकांकडून स्वयंपाक बनविण्याची भांडी घेऊ लागले.

❑❑❑

## 11

# *चौवरामध्ये ताडाची झाडे कशी वाढली ?*

खूप खूप वर्षापूर्वी चौवरा बेटावर कामासून नांवाचा एक दुष्ट माणूस राहत होता. तो त्याच्याकडील अद्भूत विद्येचा उपयोग नेहमी आपल्या जमातीच्या लोकांविरुद्ध करीत असे. त्याच्या या वाईट कृत्याला कंटाळून चौवराच्या लोकांनी एकदा त्याचे शीर धडापासून वेगळे केले आणि जंगलामध्ये फेकून दिले.

काही दिवसानंतर त्या शीर टाकलेल्या जागी एक वृक्ष उगवला त्यावरील फळे मानवी शीरासारखी दिसणारी होती. त्यानंतर चौवरामधील विहिरीचे पाणी कुजके झाले. लोकांनी आपल्या तहानेला आवर घातला. परंतु ते विहिरीचे कुजके पाणी प्यायले नाहीत. शेवटी एक माणूस इतका आजारी पडला की मरण्यास टेकला. लोक भयंकर संतापले आपल्या या आपत्तीचे कारण हे झाड या विचाराशी येऊन त्यांनी त्या झाडावर काठ्या नि दगडानी हल्ला केला. या गडबडीमध्ये त्या झाडावरून एक फळ पडले आणि ते फुटून त्यातून पाण्यासारखा द्रव पदार्थ बाहेर आला. लोकांनी त्या द्रवाची चव घेतली आणि आश्चर्य म्हणझे ती त्यांना आवडली. त्यांनी आणखी एक फळ घेतले, ते फोडले आणि त्यातील द्रव पदार्थ त्या आजारी माणसाच्या घशात ओतला. आश्चर्य म्हणजे तो माणूस आजारातून ताबडतोब बरा झाला अशाप्रकारे ताडाची झाडे चौवरामध्ये जन्मास आली.

ज्या माणसाच्या सर्वांनी तिरस्कार केला होता, त्याने आपले आयुष्य समर्पित करून लोकांचे प्रेम जिंकले.

❑❑❑



# 12

## चौवराच्या लोकांनी घेतलेला सूड

जुन्या काळामध्ये कार निकोबार आणि चौवराच्या लोकांमध्ये भरपूर व्यापार चालत असे. चौवरावासी होड्या बनविण्यामध्ये कुशल होते आणि त्या ते कार निकोबारच्या लोकांना विकत असत. आणि त्या बदल्यात ते कार निकोबारच्या रहिवाशांकडून चाकू, चांदीच्या बांगड्या कर्णफुले कापड आणि डुकरे अशा दररोज लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करीत. ही अदलाबदल अगदी नेहमी होत असे.


कार निकोबारमध्ये होड्यांना खूप मागणी होती म्हणून चौवराच्या लोकांनी होड्यांची किमत वाढविण्याचे ठरविले. कार निकोबारच्या लोकांना ते मागतील किंमत देण्यावाचून पर्याय नव्हता. एक दिवशी किमिओज गावचा प्रमुख इल्हेट याने हा प्रश्न वयस्कांच्या बैठकीमध्ये उपस्थित केला. तो उभा राहिला आणि म्हणाला, ‘चौवराचे रहिवाशी त्यांच्या होड्यांची खूप किमंत मागत आहेत. आपण ती देऊ शकत नाही. आपण या साठी काही करायला हवे.’ पेरका गावचा प्रमुख होको सुद्धा उठला आणि म्हणाला, ‘बंधुनो, हीच वेळ आहे आपण चौवराच्या लोकांना धडा शिकविण्याची’ इतर सर्व गावच्या प्रमुखांनी अशीच मते व्यक्त केली.

नेहमीप्रमाणे मार्च महिन्यात चौवराचे रहिवासी वार्षिक व्यापार महोत्सवासाठी त्यांच्या होड्यांमधून कार निकोबारला आले.

रिवाजाप्रमाणे त्या लोकांना अतिशय आतिथ्यपूर्ण अशी वागणूक दिली गेली आणि त्यांची राहण्याची व्यवस्था किमिओज्-एल.पा.नाम मध्ये करण्यात आली. कार निकोबारच्या लोकांनी त्यांच्याकडून बारापडाव विकत घेतले आणि त्या मोबदल्यात त्यांना 500 चाकू, 100 कुऱ्हाडी भरपूर कापड, 200 डुकरे इत्यादी दिले. कार निकोबारमध्ये पाच दिवस राहून ती मंडळी चौवराला परत गेली.

चौवराला परतल्यावर त्या मंडळीचे हिनसुंग या प्रमुखाने स्वागत केले. आणलेले चाकू आणि कुऱ्हाडी यांची लोकांमध्ये वाटणी करण्यात आली. परंतु लवकरत त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. आणलेल्या त्या वस्तु धातुच्या नव्हत्या तर त्या लाकडापासून बनविलेल्या होत्या. हिनसुंग मोठ्याने ओरडून म्हणाला, ‘कार निकोबारच्या लोकांनी आपल्याला फसविले आहे. आम्ही त्यांना माफ करणार नाही.’

मे महिन्यातील एका दिवशी एक मोठी होडी किमिओज बेटाजवळ आढळली. आश्चर्य



म्हणजे त्या होडीत कुणीही नव्हते. जेव्हा ती होडी किनाऱ्याला लागली किमिओजच्या लोकांनी पाहिले की त्यात तीन बॅगा भरलेली रुचकर स्वादाची केवडी (खाण्याचा पदार्थ) होती. त्या रात्री त्या गावात जंगी मेजवानी झाली. दहा डुकरांना कापून त्याचे कालवण केवडीबरोबर देण्यात आले. ते संपूर्ण गाव मेजवानीसाठी आमंत्रित करण्यात आले होते.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या असे लक्षात आले की, ज्या लोकांनी आदल्यारात्री केवडी खाल्ली ते सगळे मृत्यूमुखी पडले. फक्त एक वायो नावाची छोटी मुलगी वाचली, कारण तिने ती केवडी खाल्ली नव्हती.

विश्वासघात करणाऱ्या कार निकोबारच्या लोकांचा आपण बदला कसा घेतला ते सांगताना चौवराचे लोक वरील गोष्ट आवर्जून सांगतात.

❑❑❑

## 13

# छोट्या बेटाचे मूळ

खूप खूप वर्षापूर्वी ककाना बेटाच्या टोकाशी एक छोटे बेट होते. ते बेट कसदार गवतांनी भरलेले सुपीक असे होते. आणि नाचणाऱ्या समुद्राच्या भालावरील तो एक चमकणारा बिंदू होता. ते बेट एवढे सुंदर होते की, निकोबारच्या लोक परंपरेतील कल्पित सा-का या पक्षाने (जसा हिंदु पुराणात पक्षीराज आहे) ते पळविण्याचे ठरविले आणि फक्त आपल्यापाशीच ठेवण्याचे ठरविले. एका रात्री जेव्हा आजूबाजूला कुणी चिटपाखरू नव्हते, छोट्या पक्ष्याने त्या बेटाला आपला चोचीत पकडले आणि त्याच्यासहित भरारी घेतली.

बेट जड असल्यामुळे पक्षी वेगात धावू शकत नव्हता आणि तो आपल्या इच्छित स्थळी पोचण्यापूर्वीच दिवस उगवला. सा-का ला ते बेट चोरी करताना लोकांनी आपल्याला पाहू नये असे वाटत होते. म्हणून त्यांनी ते बेटसमुद्रात सोडून दिले वरची बाजू खाली अशा अवस्थेत ते पडले. पक्ष्याला वाईट वाटले तरी त्याने ते तसेच राहू दिले किंवा ते बेट योग्यप्रकारे ठेवण्याचा प्रयत्न सुद्धा केला नाही. कारण अगोदरच उजाडले होते. माणसांच्या हालचाली सुरू झाल्या होत्या आणि तशाने बेट चोरल्याची त्याची गोष्ट उघडकीस येण्याची शक्यता होती.

छोटे बेट म्हणून संबोधण्यात आलेले ते बेट अजूनही तशा अवस्थेत आहे आणि होडीमधून चौवराबेटावर जाणाऱ्या प्रवाशांना मार्गदर्शक जागा म्हणून मदत करते.

छोटे बेट अजूनही नापीक आणि निर्जन असा भाग आहे आणि तिथून जाणाऱ्या प्रवाशांना अजूनही सा-काची कथा आठवते.

❑❑❑



## 14

# ऑट–न्या.हुम.कु : एक जादूगार

कोणे एकेकाळी ऑट. न्या. हुम. कु नावाचा एक जादुगार होता. तो आगळा जादूगार होता आणि त्याच्याकडे जादुची आफाट शक्ती होती.

एकेदिवशी त्याच्या पत्नीने त्याला जेवणासाठी जंगलामधून काही पँडानस (एक प्रकारची फळे) आणण्यास सांगितले. ती त्याला म्हणाली, 'दरम्यान मी लाकडे तोडते आणि जेवणासाठी पाणी तयार ठेवते.'

जादूगार ताबडतोब फळे आणण्यासाठी जंगलामध्ये निघाला. तो पँडानसच्या झाडावरची फळे देठापासून तोडण्यासाठी उंच चढला. परंतु काय आश्चर्य ! तो काही फळे तोडू शकला नाही. ज्या ज्यावेळी तो फळे तोडण्याचा प्रयत्न करी, त्या त्या वेळी ती फळे देठाला परत जाऊन मिळत होती. त्याने दिवसभर खूप प्रयत्न केला. शेवटी प्रयत्नांना यश येत नाहीसे पाहून तो घरी परतला.

तो घरी रिकाम्या हाती आलेला पाहून त्याची बायको भयंकर संतापली कारण ती दिवसभर जेवणाची तयारी करीत होती आणि त्यासाठी लाकडे तोडणे, चूल पेटवणे या गोष्टी तिने तयार करून ठेवल्या होत्या. त्याच्या सांगण्यावर तिचा विश्वास बसला नाही आणि तिने त्याच्याबरोबर जंगलात जाण्याचा निर्णय घेतला. जेव्हा तिच्या नवऱ्याने परत एकदा पँडानसची फळे तोडण्याचा प्रयत्न केला आणि ती फळे देठाला जाऊन मिळाल्याने जेव्हा तिने तिच्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिले, तेव्हा तिच्या लक्षात आली की याप्रकारा मागे तिचा जादूगार नवरा आहे.

आता ती स्वतः त्या झाडावर चढली आणि तिने पॅडानसची भरपूर फळे तोडून काढली. त्यानंतर फळे घेऊन ती घरी परत आली. शेगडीवरील भांड्यात फळे टाकली आणि ती चांगली शिजवली.

दुसऱ्यावेळी एका रानटी डुकराची शिकार होती आणि माणसे शिकारी कुत्र्यांच्या भुंकण्यावरून मार्ग काढीत होते. ऑट.न्या.हुम.कु. असा एकटाच एक माणूस होती की ज्याच्याकडे फक्त एक कोयता होता. इतर सगळ्यांकडे भाले बरचे, धनुष्य व बाण अशी हत्यारे होती. तेव्हा जंगलातून रस्ता मोकळा करण्याचे काम त्याच्यावर आले. परंतु ज्या ज्यावेळी तो झाडाची फांदी तोडून पुढे जात होता त्यावेळी ती तुटलेली फांदी परत झाडाला





येऊन मिळत होती. त्यामुळे इतर माणसे पुढे जाऊ शकत नव्हती, कारण त्यांना पुढे जाण्यास मार्गच नव्हता. अशा रितीने तो जादूगार त्यांच्यापासून खुप पुढे निघून गेला. काही वेळानंतर इतर लोकांनी आपला प्रयत्न सोडून दिला आणि ते सर्व घरी आले. ऑट.न्या.हुन. कु. हा एकटा मागे राहिला आणि त्याला शिकारीचा सर्व ऐवज मिळाला. या घटनेनंतर सर्व लोकांना तो खरोखर मोठा जादूगार आहे याची खात्री पटली.

नंतर तो आजारी पडला आणि त्याचा अंत झाला. रिवाजाप्रमाणे त्याचे शरीर झाडावर लटकविण्यात आले. परंतु तो काही दिवसानंतर परत जिवंत झाला हे प्रत्यक्ष पाहून लोक चकित झाले. ऑट.न्या.हुम. कु. वृद्धापकाळामुळे मरण पावला. तेव्हा मरण्यापूर्वी त्याने जवळच्या लोकांना बजावले की, मी जेव्हा मरेन तेव्हा मला पूरा आणि माझ्या प्रेताच्या खळग्यामध्ये एक भोक ठेवा. कारण मी फक्त तीन दिवस जिवंत नसेन आणि आणि त्यानंतर तुम्ही मला खणून बाहेर काढा. असे जर तुम्ही केलेत तर मी जिवंत राहिन. मात्र मी सांगतो तसे जर केले नाहीत तर मात्र मी मरेन आणि परत जिवंत होऊ शकणार नाही.

त्या माणसांना तो जादूगार जिवंत राहयला नको होता. म्हणून त्यांनी जादूगाराने सांगितल्याप्रमाणे केले नाही. घाणीने व्याकूळ होऊनही त्यांनी प्रेतावरचे भोक वाळू व मातीने भरून टाकले. अशाप्रकारे तो जादूगार शेवटी कायमचा मेला.

□□□

15

# पिशाच्च आणि रानटी डुकरे

खूप खूप वर्षापूर्वी निकोबार बेटावर रानटी डुकरांचा सतत उपद्रव होत असे. त्यांची संख्या पुष्कळ होती आणि ते हिंसक होते. एकदा एक माणूस जंगलामधून एकटा चालला होता तेव्हा एक डुकरांचा घोळका त्याच्यासमोर आला. ते त्याच्यावर चालून गेले आणि त्या माणसाला त्यांना फाडून टाकले.

जेव्हा त्या माणसाच्या मोठ्या भावाला ही गोष्ट कळली तेव्हा त्याने आपल्या छोट्या भावाच्या मृत्युचा बदला घेण्याचे ठरविले. सगळ्या रानटी चुकरांचा संहार करण्याचे ठरविले. म्हणून तो दिवस नि रात्र आपल्या हत्याराच्या पात्यांना धार लावत बसला. ते हत्यार त्याने झाडीच्या फांदीवर फिरवले आमि ती फांदी एका क्षणात छाटली गेली.

तरीसुद्धा त्याचे समाधान झाले नाही आणि तो आपल्या हत्याराला धार लावित बसला. जेव्हात्याने हत्याराचे पाते निरीक्षण करण्यासाठी वरच्या बाजूला केले तेव्हा त्याचवेळी एक माशी त्यावर बसली आणितिच्या शरीराचे ताबडतोब दोन तुकडे झाले. 'हा आता माझे काम बरोबर होणार' तो खुषीत उद्गारला.

त्यानंतर तो जंगलात गेला आणि त्याने त्याच्या हत्यारासाठी मूठ म्हणून बाबूंचा एक तुकडा तोडला आणि कोयत्यावर जशी मूठ असते, तशी हत्यारावर तो तुकडा घट्टपणे आडवा बसवला. त्यानंतर तो एका मोठ्या झाडावर चढला आणि जंगली श्वापदांना गोड शब्दात बोलवण्यास सुरुवात केली. 'क्रूर रानटी डुकरानो. माझ्या प्रिय डुकरानो जवळ या. मला वाचवा, मला वाचवा.'

रानटी डुकरांचा एक कळप लवकरच घाईत आला आणि फुरफुरत व डुरकत राहिला. ते एकमेकांच्या एकावर एक असे चढले. त्यांना त्या झाडावरील माणसापर्यंत पोचण्याची घाई झाली होती. ते त्याच्यापर्यंत पोचल्याबरोबर त्याने त्यांना पोटामध्ये आपल्या तीक्ष्ण हत्याराने भोसकले. एका पाठोपाठ एक ती सगळी डुकरे एकमेकांवर मरून पडली. त्यानंतर त्याने हा मारण्याचा प्रयोग परत एकदा केला.त्याने त्यांना जवळ बोलावले आणि ती जवळ आल्यानंतर त्यांना भोसकले. अशा तऱ्हेने दुसरा कळपही यमसदनास गेला.

तिसऱ्यावेळी जेव्हा तो रानटी डुकरांची सामुदायिक हत्या करीत होता, त्या डुकरांचा प्रमुख पिशाच्च त्याला हा प्रकार पाहवला नाही आणि तो त्याला म्हणाला,



'अरे क्रूर माणसा हे आता खूप झाले. मी यापुढे पाहू शकत नाही.'

तो माणूस उतरला, 'नाही, मी त्यांना परत एकदा पाहून घेईन.'

अशाप्रकारे तिसऱ्या कळपांची हत्या केल्यानंतर तो माणूस झाडावरून खाली उतरला आणि त्यांनी ते सगळे मेलेले डुकर आपल्या घरी आणले तिथे त्याने ती मेलेली रानडुकरे भाजण्यासाठी खूप मोठा जाळ केला. कारण त्या सर्व डुकरांना भाजण्यासाठी हाच योग्य मार्ग होता. परंतु त्याने जेव्हा त्या डुकरांची दुसरी बाजू भाजण्यासाठी फिरवली तर ती डुकरे परत फिरून पहिल्या बाजूकडे वळत होती. डुकरांचे मटण भाजण्याचा त्याचा प्रयत्न पूर्ण फोल ठरत होता.

आणि हे प्रत्येक डुकराच्या बाबतीत घडत होते. म्हणून त्याने प्रयत्न सोडून दिला. तो आपल्या घरी जाण्याच्या प्रयत्नात होता इतक्यात त्या डुकरांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी आसूसलेला पिशाश्च तिथे अवतरला आणि त्याला म्हणाला, 'तुला मगर आवडेल का?'

तो माणूस म्हणाला, 'मी त्यासाठी समुद्रात उडी घेईन '

पिशाश्च्याने परत विचारले, 'मग तुला साप आवडेल का?'

'अशा परिस्थितीत मी त्याला मारीन' तो माणूस उद्गारला

तो माणूस घराची शेवटची पायरी चढत होता, इतक्यात सापाने त्याला दंश केला आणि तो उंबरठ्याकडे जाईपर्यंत त्याचा देह कोसळला.

त्या दिवसापासून निकोबारी माणसे पिशाश्च्याला खूप घाबरतात आणि रानडुकराची हत्या करताना खूप काळजी घेतात, त्याची मिरवणूक काढतात.

❑❑❑

# 16

## *बोम्पोका बेटाचा जन्म*

बोम्पोका आमि टेरेस्सा या बेटांचे रहिवाशी ही बेटे निर्माण कशी झाली, त्याची मनोरंजक दंतकथा सांगतात.


कोणे एके काळी राजपुत्र आणि त्यांची सुंदर पत्नी यांना घेऊन एक जहाज आनंदी जलपर्यटनासाठी बाहेर पडले. ते जहाज स्वतः राजपुत्राच्या अधिपत्याखाली होते. दीर्घ आणि कंटाळवाण्या प्रवासानंतर ते जहाज टेरेस्सा बेटाच्या किनाऱ्यावर अन्न घेण्यासाठी तसेच विश्रांती घेण्यासाठी थांबले तो राजपुत्र आपला प्रिय पत्नीसह त्या बेटावर उतरला. तेथील स्थानिक रहिवाशांनी राजपुत्रला ठार मारले. त्याच्या पत्नीला त्या लोकांनी अतिशय आदराने वागविले. ज्या जागेवर तिच्या पतीचा वध झाला होता ती जागा तिला सतत सलत होती. आपल्या नवऱ्याची मेल्यानंतरची भयंकर अवस्थ ती कधी विसरू शकत नव्हती. ती नेहमी दुःखी आणि विचारमग्न राहत असे. त्या रहिवाशांनी तिला सर्वच प्रकारच्या सुख सुविधा दिल्या आणि तिला सर्व प्रकारे खूष करण्याचा प्रयत्न केला. असे असूनही ती अत्यंत खिन्न स्थितीत राहत असे. तिच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर जणू काही तिच्या जीवनातून सगळा आनंद निघून गेला होता.

एका रात्री खुप दमल्यामुळे तिला गाढ झोप लागली. तिला स्वप्नात आपली आई दिसली. तिची काळजी करताना व सांत्वन करताना ती म्हणाली, 'माझ्या प्रिय मुली तू किती दुःखी आहेस. किती उदास आयुष्य तू जगत आहेस ! तुला जर शांतता हवी असेल तर ती रक्तबंबाळ जागा टेरेस्सापासून वेगळी कर. ते पश्च्यातापदग्ध दृश्य नष्ट कर. तिरस्कार युक्त आठवणींचा पूर्ण नाश होऊ दे, नाहीतर तुला कधी मनः शांती मिळणार नाही.'

आपल्या आईच्या स्वप्नातील सल्ल्याने त्या तरुण राजकुमारीला स्फूर्ति मिळाली आणि तिने ज्या जागेवर तिच्या नवऱ्याचा वध करण्यात आला होता, बेटाची ती जागा तोडण्यास सुरुवात केली. तिने दिवस रात्र मेहनत घेतली आणि ती शापित जागा बेटापासून वेगळी करण्यात ती यशस्वी झाली.

अशाप्रकारे त्या रक्तांच्छित जागेवर एक नवीन बेट निर्माण झाले त्या बेटाला नंतर बोम्पोका असे नांव पडले.

❑❑❑



# 17

## शार्क माशाची गोष्ट

खूप खूप वर्षापूर्वी दोन तरुण मुली खडकावरून जात होत्या.तो खडक सरळ समुद्रापर्यंत पोचला होता.

एकाएकी त्यापैकी एका मुलीचा छोटा चाकू समुद्रात पडला आणि तो एका का-हु-को नावाच्या मोठ्या माशाने गिलंकृत केला. त्या माशाचे तोंडही मोठे होते आणि पंखसुद्धा भयंकर होते.

ती मुलगी आपल्या मैत्रिणीला म्हणाली, 'अग मला लगेच उडी मारू दे आणि त्या चाकूचा शोध घेऊ दे, नाहीतर तो कधीच मिळणार नाही. अशाप्रकारे तिने समुद्राच्या पाण्यात उडी घेतली. तीसुद्धा तिचा छोटा चाकू गेला तशी सरळ मोठ्या माशाच्या पोटात जाऊन बसली.'

शिंपल्याशी खेळत ती मुलगी समुद्र किनाऱ्यावर आपल्या मैत्रिणीची वाट पाहत खूप वेळ बसली. नंतर ती स्वतःशी पुटपुटली, 'ती इतका वेळ काय बरे करीत असेल ?' आपल्या मैत्रिणीचा शोध घेण्यासाठी धप्प आवाज करीत तिनेही पाण्यात उडी मारली. ती सुद्धा सरळ त्या मोठ्या माशाच्या पोटात गेली.

नंतर तो मासा पोहत महासागराच्या मध्यभागी आला. त्या दोघी मैत्रिणींची त्या माशाच्या पोटात भेट झाली. त्यांचा हरवलेला चाकू आता सापडला होता.

काही वेळानंतर एक मुलगी म्हणाली, 'मला खूप भुक लागली आहे.'


हे एकून तो मासा म्हणाला, 'तुम्ही माझ्या काळजाचा एक तुकडा कापून तो खात का नाही ?' त्यांनी त्यांचा सल्ला मानला आणि त्याच्या काळजाच्या मोठा भाग कापून आपली भूक भागवली.


तो मासा त्यांना म्हणाला, 'ओ ! तुम्ही मुली मर्यादेच्याबाहेर काही करत तर नाही ना?'

'नाही, नाही ! त्या मुली उत्तरल्या.'

त्या माशाने खूप अंतर कापले आता दुसरा दिवस उजाडला. परत त्या मुलींना भूक लागली. आता तो मासा परत त्यांना म्हणाला, 'माझ्या काळजाचा काही भाग कापून तुम्ही भूक भागवा.' त्या मुलींनी तसेच केले.

'ओ ! अशाप्रकारे जास्त काळ जगता येणार नाही' तो मासा वेदना सहन करीत म्हणाला





आणि परत त्या मुली 'नाही, नाही' म्हणून ओरडल्या.

असे खूपदा घडले आणि शेवटी त्या माशाला खूप अशक्तपणा आला.

काही काळानंतर त्याने ओकारी केली आणि त्या मुलींना समुद्राच्या मध्यावरील मोठ्या खडकावर फेकले आणि तो पोहत दूर निघून गेला.

काही काळानंतर त्या दोघी मुली त्यांच्याकडे येणाऱ्या एका शार्क माशाच्या दृष्टीस पडल्या

'घाबरू नका, मुलीनो' तो शार्क म्हणाला, 'मी तुम्हाला अनेक दिवस शोधत आहे. चला माझ्या पाठीवर बसा. मी तुम्हाला किनाऱ्यापर्यंत पोचविन'

त्या मुलींनी शार्क माशाच्या पाठीवर बसण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या पाठीवरून निसरडून लागल्या कारण त्याची पाठ खूप बुळबुळीत होती. त्या माशाने त्यांना प्रथम पाठ चोळून नंतर त्यावर बसण्यास सांगितले.

त्या मुलींनी पाठ चोळली आणि परत त्यावर बसल्या. ती आता कमी निसरडी झाली होती. त्यानंतर त्या प्रेमळ शार्क माशाने त्यांना वाहून नेले आणि त्यांना समुद्रात उडी मारलेल्या जागी सोडले.

त्यानंतर त्या मुली अतिशय आनंदात आपल्या घरी गेल्या आणि तो प्रेमळ शार्क त्याच्या जागी परत गेला.

❑❑❑

## 18

# माणसाचे रुपांतर बेडकात कसे झाले !

कोणे एके काळी सुटीच्या दिवशी(धार्मिक समारंभा नंतरचा आरामाचा दिवस) पाळणाऱ्या कर्मपद्धती आणि मर्यादा यांकडे लक्ष न देणारा माणूस राहत होता. तो त्या दिवशी जंगलातही जात असे.

सुटीच्या दिवासापूर्वीच्या रात्री सारी माणसे पिशाश्च्यांना पळवून लावण्यासाठी संपूर्ण रात्रभर एकत्र जमत. ते त्या दिवशी स्फूर्तिदायी गाणी म्हणत. स्फूर्तिदायी नृत्ये करीत आणि पिशाश्च्यांना भाल्याने भोसकीत. दुसऱ्या दिवशी सकाळी चेटकीणींद्वारे माणसाळलेल्या दुष्ट आत्म्याची ताफ्यावर बसवून रवानगी केली जाई. अशाप्रकारे माणसे दुसरा संपूर्ण दिवस आरामात काढीत.


या माणसाच्या जंगलातील बागेत काही केळीची झाडे होती आणि त्यातील एक झुबका पिकला होता. तो झुबका कसा वाढतो आहे हे पाहण्यास तो उत्सुक होता आणि तो पिकला. असल्यास तोडावा या विचाराने तो पाहण्यासाठी तो चोरून निघाला जेव्हा तो तिथे पोचला, तो कुंपण ओलांडून बागेत उतरला आणि त्याने केळीचा झुबका तोडला. त्याच्या कृत्यानंतर पिशाश्च्याने त्याचे रुपांतर एका मोठ्या बेडकामध्ये केले.

आता पिशाश्च्यांना पळवून लावणाऱ्यापैंकी तो एक झाला आणि रात्री स्फूर्तिदायी नृत्ये करण्याचे कामही त्याच्याकडे आले. त्यासाठी त्याचा चेहरा लाल रंगाने ओबडधोबड रंगविण्यात आला आणि म्हणून त्याचे ज्या मोठ्या बेडकामध्ये रुपांतर झाले होते, त्यावर लाल रंगाचे पट्टे होते.

त्याच्या मित्रांनी त्याचा खूप दिवस शोध घेतला परंतु त्यांना तो सापडला नाही. कारण आता त्याचे बेडकामध्ये परिवर्तन झाले होते.

अशाप्रकारे मोठे बेडुक पृथ्वीतलावर आले. आजही हे मोठे बेडुक लाल आणि पिकलेल्या केळीची झाडे या विषयी आपला मोह लपवू शकत नाहीत. आणि ती त्यांना जिथे दिसतात तिथे त्यांना फक्त करतात.

❑❑❑



## 19

# *झाडे चालायची का थांबली*


खूप खूप वर्षांपूर्वी जेव्हा आपले जग अगदी बाल्यावस्थेत होते, झाडे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाऊ शकत आणि जमिनीखालच्या मूळांना वेगवेगळ्या जागी पाठवू शकत. त्याकाळी माणसे आणि झाडे एकमेकांची उपकारकर्ती होती. प्रवास करताना माणसे क्वचित थकून जात. कारण झाडे ते नेत असलेले सामान आपल्या फांद्यांवर ठेवायला देत. झाडांना माणसाजवळील वजन वाहून नेणे आनंदाचे वाटे आणि माणसे त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे पाहिजे तिथे हाकून नेत.

जेव्हा माणसांना जंगलामधील आपल्या बागांमधून वस्तू आणाव्याशा वाटत, ते एवढेच करीत की त्या वस्तू तोल सांभाळून झाडांच्या फांद्यावर ठेवित आणि झाडे त्या त्यांच्या गावापर्यंत घेऊन येत. शिवाय त्या दिवसात ज्या माणसांना चालण्याचा त्रास असे ती झाडांच्या फांद्यावर बसत आणि सुरक्षितपणे आपल्या घरी आणली जात किंवा जिथे त्यांना जायचे असेल तिथे त्यांना नेले जाई. किती विलक्षण प्रवास होता तो ! एकदा खूप माणसे जंगलात गेली. गावाकडे परत येतांना त्या प्रत्येकाकडे खूप काही सामान जमले. त्यांनी ते सगळे झाडांच्या फांद्यावर ठेवले आणि त्यांच्यासह ते निघाले. परंतु त्या फांद्यावर ठेवलेल्या भरपूर वजनामुळे ती झाडे डळमळू लागली, रस्त्यात अडखळू लागली. त्याबरोबर जी माणसे पाठीमागून येत होती ती झाडाच्या एकमेकांवर पडल्यामुळे आणि एकमेकांवर आपटल्यामुळे जे एक विनोदी दृश्य निर्माण झाले त्याने फिदीफिदी हसली. त्यांनी कर्कश आवाजात टाळ्या पिटल्या. त्यांच्या या टवाळकीने झाडांना अतिशय त्रास झाला त्यांना आपली मानखंडना झाल्यासारखी वाटली आणि त्यांनी त्यापुढे चालायचे थांबवले.

आजकाल आपण जेव्हा प्रवास करतो, स्वतःच सामान उचलून आपण खूप त्रास करून घेत असतो. कारण झाडे आता चालत नाहीत. त्यामुळे त्यांची मदत होत नाही.

झाडे चालायची का थांबली त्याची ही गोष्ट होय.

❑❑❑



# 20

# *दुष्ट आई*

खूप वर्षापूर्वी एका बेटावर एक पुरुष आणि त्याची बायको राहत होती. त्या जोडप्याला तीन मुले होती. एके दिवशी त्या पुरुषाला समुद्रात जाऊन मासे पकडायला जायचे होते. म्हणून तो बायकोला म्हणाला, 'मुलांना नारळाच्या करवंट्या जमा करण्यास सांग त्याचा आपण जाळ करू आणि मी आणलेले मासे विस्तवात भाजून खाऊ' बायकोनं होकारार्थी मान हलवली. ती खरं म्हणजे वेष पालटून बसलेली दुष्ट जखिण होती. पुरुषाच्या गैरहजेरीत तिनं त्या कुटुंबाचा नाश करण्याची संधि घेतली.

तिने सर्व मुलांना घराच्या बाहेर पाठविले आणि त्यांना त्यांच्या वडिलांनी सांगितलेले काम करण्यास सांगितले.

दरम्यान तिने आपल्याकडील वस्तऱ्याला चांगली धार लावाली. त्यानंतर तिने मुलांना जाळ करण्यास सांगितले आणि सर्वात मोठ्या मुलाला जवळ बोलावून घेतले. ती त्याला म्हणाली, 'ये, मी तुझ्या डोक्याची हजामत करते.'

त्याला आपल्या आईच्या रुपातील जखिण खरोखर का बोलवित आहे, त्या मागचे कारण माहित नव्हते. म्हणून तो तिच्याकडे आला आणि तिने त्याच्या डोक्याची हजामत करण्यास सुरुवात केली नंतर एकाएकी तिने त्याला लाथ मारली आणि त्याचे डोको धडापासून कापून टाकले. अशा प्रकारे तिने दुसऱ्या मुलाला बोलविले आणि त्याचे डोके त्याचपद्धतीने कापले. त्यानंतर तिने ती डोकी अग्नित टाकून त्यांना जाळून टाकले.

जेव्हा सर्वात लहान मुलाची पाळी आली त्याने येण्यास नकार दिला. तो म्हणाला, 'नाही. मी येणार नाही कारण तू माझ्या दोन भावांचे जे केलस तेच माझेही करशील.'

ती जखिण उत्तरली, 'मी तुला कुठल्याही प्रकारे इजा करणार नाही कारण तू माझा असा एक आहेस जो माझ्यासाठी सुपारी चावून बारीक करतोस आणि चघळतोस, तू माझा आवडता मुलगा आहेस,' 'खरं म्हणजे ती फक्त त्याला लालूच दाखवीत होती. शेवटी तो तयार झाला आणि तिने त्याचे डोकेसुद्धा कापले.

त्यावर जेव्हा तिचा नवरा परत आला त्याने आपल्या मुलांच्या ठाव ठिकाणा विचारला. त्यावर ती उत्तरली,' मला माहित नाही. ती कदाचित टा-चोई झुडपांध्ये खेळत असतील.

वडिलांनी मुलांना हाक मारली परंतु त्यांनी ओ दिली नाही



परत त्याने बायकोला विचारले, मुले कुठे आहेत ?

ती उत्तरली, 'कदाचित ती पाणी आणायला गेली असतील किंवा कदाचित ती मोठ्या पेटाऱ्यांच्या मागे लपली असतील.'

त्या माणसाने आपल्या मुलांचा प्रत्येक ठिकाणी शोध घेतला. त्याची बायको मात्र शांतपणे बसली होती. त्या मुलांचा काही शोध लागला नाही तो माणूस खूप दमला आणि त्याला भूक लागली. म्हणून त्याने बायकोला नेहमीप्रमाणे चुल्याजवळ लोंबकळत ठेवलेल्या टोपलीमधील अन्न वाढण्यास सांगितले. अशा प्रकारे भूकेलेला तो जेवण्यास बसला आणि त्याच्या जवळ बायकोच्या वेषातील जखिण बसली.

त्याने जेवण्यास जेव्हा प्रारंभ केला त्याची बायको त्याला म्हणाली, 'तू आता खात आहेस ते तुझ्या मुलांच्या हातांचे पंजे आहेत. तुला माहित आहे का की तू तुझ्या मुलांचे मांस खाल्ले आहेस?'

त्यानंतर तिच्यात बदल झाला आणि तिचे रुपांतर गरूड पक्ष्यात झाले. औक-औक-औक असा गरुड पक्ष्याचा आवाज करीत ती उडून गेली. मुलांचा बाप काही करू शकला नाही. निराश होऊन त्याने आपले डोके भिंतीवर आपटण्यास सुरुवात केली आमि तो हताशपणे रडू लागला.

त्यानंतर त्याचे घुबडामध्ये रुपांतर झाले. अजूनपर्यंत तो आपल्या दुःखाचा शोक करीत असतो.

❑❑❑

# 21

# किलफ्यूट घरी परत

खूप वर्षापूर्वी एक माणूस आपल्या काही मित्रांबरोबर होडीमधून मोठ्या जहाजावर गेला. तिथे त्याला नारळाच्या बदलात पावासारख्या आणखी काही उपयुक्त वस्तु घ्यायच्या होत्या. तो त्या जहाजावर अशावेळी आला जेव्हा ते जहाज परत निघण्याच्या बेतात होते आणि ही गोष्ट त्याच्या लक्षात येण्यापूर्वीच जहाजाने शीड टाकले. आता तो इतरांपासून वेगळा पडला.

होडीमधील त्याच्या मित्रांनी त्याचा शोध घेतला. तो काही त्यांना सापडला नाही. त्याच्या आई वडिलांनी त्याची खूप वाट पाहिली. शेवटी अनेक दिवस आणि महिने सरल्यानंतर त्यांनी तो मेल्याची समजूत करून घेतली.

दरम्यानच्या काळात तो माणूस ज्याचे नाव किलफ्यूट होते, त्या जहाजाबरोबर अनोळखी प्रदेशी आला. तिथे त्याने कायमची वस्ती केली आणि तो मासेमारी करीत पोट भरू लागला. लवकरच तो धंद्यात खूप यशस्वी झाला, श्रीमंत बनला. त्याचे लग्न झाले आणि त्याला मुलगा आणि मुलगी अशी दोन मुले झाली. वर्षे सरली तशी मुले मोठी झाली.


किलफ्यूट जरी सुखी कौटुंबिक आयुष्य जगत होता, जुन्या दिवसांच्या आठवणी त्याचा नेहमी पाठलाग करीत. एक दिवशी तो आपल्या मूळ प्रदेशात जाण्यासाठी उतावीळ झाला. एक लहान बोटीमध्ये आपल्याला पुरेल एवढे अन्न स्वच्छ पाणी आणि काही कपडे त्यांनी घेतले आणि आपल्या बायको मुलांना ठेवून तो प्रवासावर निघाला.

त्याने होडी काही अंतर वल्हविली आणि होडीची शिडे उंचावली. त्याला ते जड जात होते, कारण वल्हवण्याचे काम वा शिडांवर ताबा ठेवण्याचे काम त्याला एकट्याला करावे लागत होते.

तो आपल्या मूळ गावी पोचला, तेव्हा मध्यरात्र झाली होती. तो सरळ आपल्या घरी दाखल झाला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आईवडिल ओस्सुअरी फिस्ट(मुलाच्या मरणानंतर करण्यात येणारे भोजन) करीत असलेले त्याला आढळले आणि त्याचे कारण म्हणजे तो मेल्याचे त्यांनी गृहित धरले होते.

त्यांनी तिथले नृत्य काही वेळ पाहिले. त्यानंतर तो डुकरे ठेवण्याच्या जागेत गेला. त्यांनी त्यांच्या कानाना स्पर्श केला आणि स्वतःशी म्हणाला, 'या डुकराना मी स्वतःच्या हातांनी खूणा केलेल्या आहेत.'

तहान लागल्यानंतर तो बाहेर गेला आणि त्याने स्वतःच्या नारळाच्या झाडावरून काही फळे





काढण्यास सुरुवात केली. त्यावर तिथून जाणारी काही माणसे ओरडली, ‘कोण आहे तिथे ? आणि मृत मरणासाठी बाजूला ठेवलेल्या झाडाची फळे तू का तोडतो आहेस ?’

त्याने विचारले, ‘कोण मेला आहे ?’

त्यावर ती माणसे उत्तरली, ‘किलफ्यूट’

‘परंतु किलफ्यूट तर मी आहे.’ त्याने उत्तर दिले.

लोकांनी हे ऐकल्याबरोबर आनंद व्यक्त केला.

तो जिवंत आहे हे पाहून सर्व खूष झाले. त्यांनी मग त्याला त्याच्या घरी नेला आणि आनंदोत्सव साजरा केला.

❑❑❑

# 22

# चंद्रावरील मुलगी

कोणे एकेकाळी कार निकोबारमध्ये एकाकी जागी असलेल्या घरात एक विधवा स्त्री चार मुलींसह राहत होती. त्या चौघींमध्ये तीन मुली मोठ्या वय झालेल्या तर शेवटची मुलगी छोटी होती. त्या छोटीचे नांव होते टो-मी-रॉक(म्हणजे सौंदर्य) तर इतर मुलींची नांवे अशी होती. टो-केन(मेहनती), टो-पेट-नागेन( स्वतःपूरते पाहणारी) आणि वा-मी-रो( गोष्ट सांगणारी)

घरापासून काही अंतरावर त्यांची बाग होती. उन्हाळ्याच्या प्रारंभी जेव्हा निरूपयोगी झाडे बागेत वाढली होती, आईने मुलींना तो झाडे तोडून टाकण्यास सांगितले. ती स्वतः जाऊ शकत नव्हती. कारण सर्वात छोट्या मुलीची देखभाल करण्यास दुसरे कुणी नव्हते.

दुसऱ्या दिवशी सकाळी मोठी बहिण टो-केन आपल्या दोन बहिणींसह जंगलात निघाली. तिथे गेल्यानंतर त्या बहिणीनी काम सुरू केले.

सूर्य जसजसा आकाशात वरती आला तसतसे वातावरण अधिक उष्ण होऊ लागले. थकल्यामुळे त्या बहिणींपैकी वा-मी-रो विश्रांती घेण्यासाठी झाडाच्या सावलीत गेली. त्यानंतर ती झाडावर चढली आणि झाडांच्या पारब्यांवर लोंबकळून खूप खेळली, मजा केली. तिने दिवसाच्या राहिल्या वेळातही काही काम केले नाही. दुसऱ्या दोन्ही मोठ्या मुलींनी सूर्याचे प्रखर उन पाठीवर झेलून खूप काम केले.

'वा-मी-रो कृपया खाली ये आणि ही वाढलेली झाडे काढण्यात मदत कर.' टो-केन म्हणाली

त्या विनंतीचा काही परिणाम झाला नाही. कारम वा-मी-रो  ला कुठल्याच प्रकारचे काम करायचे नव्हते.

टो-पेट-नागेत (दुसरी बहिण) तिला म्हणाली, 'आपण जेव्हा घरी परत जाऊ आईला तुझ्याबद्दल सांगू मग तुला खूप मार मिळेल.' परंतु वा-मी-रो यानेसुद्धा बधली नाही. कारण ती आईची आवडती मुलगी होती.

जेव्हा संध्याकाळ झाली वा-मी-रो ने आपल्या डोक्यावर चिखलाचे काही शिंतोडे उडवून घेतले आणि ती दोघी बहिणींच्या अगोदर घरी पोचली. तिने आईला सांगितले, दिवसभर मी एकटीने काम केले. दुसऱ्या दोघींनी दंगामस्ती केली आणि दिवसभर खेळण्याशिवाय काही



केला नाही.

हे ऐकल्यावर तिची आई खूप रागावली आणि म्हणाली, 'त्यांना येऊ दे तर खरं. मी त्यांना चांगला धडा शिकवते. तू खूप थकली असशील म्हणून जा आणि जेवून घे. जेवण फळीवर ठेवलेले आहे.'

थोड्या वेळानंतर दिवसभर कामाने पूर्ण थकलेल्या त्या दोघी मोठ्या बहिणी घरी पोचल्या. कुठल्याप्रकारे स्वागत न झाल्यामुळे त्यांची खूप निराशा झाली. त्यांना अगदी कमीजेवण देण्यात आले. त्यांनी ते शांतपणे खाल्ले.

त्यांचे जेवण संपल्यानंतर त्यांच्या आईने विचारले, 'जेवण चांगले होते की नाही ?' त्यावर त्या उत्तरल्या, 'हो चांगले होते.'

'तुम्हाला हे माहित आहे की, मी तुम्हाला आज जनावरांसाठी राखून ठेवलेले अन्न दिले कारण तुम्ही दोघींनी काही काम केले नाहीत, फक्त खेळत राहिलात आणि स्वतःचे मनोरंजन केलेत !'

आईचे बोलणे ऐकल्यावर टो-केन आणि टो-पेट-नागेन या अतिशय दुःखी झाल्या. त्यांनी उत्तरादाखल काही म्हटले नाही कारण त्यांना माहित होते की, त्यांची आई वा-मी-रो ने जे तिला सांगितले त्याच्यावर नेहमी विश्वास ठेवला. त्याची ती पुनरावृत्ती करीत होती.

त्या अतिशय निराश झाल्या. त्यांचे आपल्या घरावरचे सर्व प्रेम संपले आणि त्यांनी पळून जाण्याचा निश्चय केला. एका छोट्या पेटीमध्ये आपले सामान भरून त्या रात्री त्यांनी चोरपावली घर सोडले. बेटावर कुठेही गेल्यास आई त्यांना शोधून काढेल या विचारांनी त्यांनी चंद्रावर जाण्याचा निश्चय केला.

भटकत असताना त्यांना एक टो-आ-न्यू-ओ नावाची खाली लटकलेली वेल दिसली. त्या वेलीच्या साहाय्याने त्यानी आकाशात जायचा प्रयत्न केला. परंतु लवकरच तो प्रयत्न सोडून दिला.

'चल कोळ्याच्या जाळ्याच्या मदतीने चढण्याचा प्रयत्न करू या' टो-केनने सुचवले.

'आपण पाय ठेवल्याबरोबर ते तुटले, तर आपली फजिती नाही का होणार ?' टो-पेट-नागेन म्हणाली.

'काही असले तरी प्रयत्न करू या.' दुसरी उत्तरली.

अशाप्रकारे प्रथम टो-केन वर गेली आणि त्यानंतर तिच्या बहिणीने तोच कित्ता गिरवला. आश्चर्याची बाब म्हणजे कोळ्याचे जाळे तुटले नाही. त्या दोघी अधिक अधिक वर गेल्या. त्यांनी खूप अंतर कापल्यानंतर त्यांच्या एकाएकी लक्षात आले की, त्या रा-फोहची बनवलेली छोटी छानशी करंडी खाली विसरल्या आहेत. म्हणून टो-केन ने तिच्या छोट्या बहिणीला ती आणण्यासाठी खाली धाडले.

तथापि ती घरी पोहचल्याबरोबर तिच्या आईने तिला ताबडतोब पकडले. आईने वा-मीरो ला टो-पेट नागेनवर लक्ष ठेवण्यास सांगितले आणि स्वतः टो-केनला शोधण्यासाठी

गेली. तिला जमिनीपासून काहीच अंतरावर कोळ्याच्या जाळ्यावर असलेली टो-केन सापडली. ती आपली बहिण टो-पेट-नागेनची वाट बघत होती आणि त्यासाठी काही अंतर खाली आली होती. आईने तिला ताबडतोब खाली येण्यास सांगितले. परंतु तिने नकार दिला. त्यानंतर तिने टो-केन चा पाय पकडला आणि खाली ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने कोळ्या जाळे घट्ट पकडले आणि लाथ मारून आईच्या पकडीपासून स्वतःला मोकळे केले. या क्रियेमध्ये तिच्या एका पायाचा लवचिकपणा हरवला. असे होऊनही ती चढून वर गेली आणि शेवटी चंद्राच्या पृष्ठभागापर्यंत पोचली. आपल्या निष्ठुर आईच्या पंज्यामधून आपण मोकळे झालो याने ती भयंकर खूष झाली. चंद्राच्या पृष्ठभागावर तिने अंग टाकले आणि ती झोपली तिने जवळच्या पेटीचा उशी म्हणून वापर केला.

निकोबारचे रहिवासी अजूनही मानतात की चंद्रावरचे पट्टे म्हणजे तिथे शांतपणे पहुडलेल्या टो-केन ची सावलीमय आकृती होय. पौर्णिमेच्या दिवशी कुणीही हे पाहू शकतो.

❑❑❑

23

# दृष्ट आत्म्याची जादू

खूप खूप वर्षापूर्वी कार निकोबारची माणसे दुसऱ्या बेटांवर नारळे तोडून आणण्यासाठी जात असत. ते तिथे रानटी डुकरे आणि कोंबड्यांची पिल्ले पकडण्यामध्ये सुद्धा खूप दिवस घालवित.

एकदा तर ते कॅमोर्टा बेटावर काही महिने वस्ती करून होते. भरपूर नारळ आणि पुरेशी शिकार करून त्यांनी एका चांगल्या दिवशी कार निकोबारसाठी प्रयाण केले. परंतु हवामान वादळी आणि धोक्याचे बनले. भयंकर वारा आणि सतत पडणारा पाऊस यांनी त्यांच्या बोटी वाट चुकल्या आणि ते ओढले जाऊन एका अनोळखी बेटावर पोचले.

बोटीवरील खलाशांच्या ताबडतोब लक्षात आले की, ते बेट दुष्ट आत्म्याचे वसतिस्थान आहे. तिथे पक्षी गात फिरत नव्हते, फुले फुलत नव्हती आणि झाडांची पाने लाल बनली होती. रक्त गोठवणाऱ्या कर्कश आवाजानी प्रत्येकजण घाबरून गेला होता.

दुःखी माणसे सर्व बेटाभोवती फिरली आणि त्यांना तिथे जिवंत माणसे, पाणी वा नारळ यांपैकी काही आढळले नाही. ते गर्भगळीत आले. परंतु त्यांच्यापुढे दुसरा मार्ग नव्हता. वादळ शांत होईपर्यंत त्यांना तिथे थांबणे भाग होते म्हणून त्यांनी त्यांची तहान आणि भूक त्यांच्या साठ्यातील नारळासारख्या फळांवर भागवली.

जसे दिवस गेले तिथे एक अनोळखी रोग पसरला. त्या सर्वांची भूक हरवली आणि ते सर्वजण आजारी पडले. त्यातील एकाला दुष्ट आत्म्याची मनधरणी करा वयाच्या गोष्टी माहित होत्या. परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. शेवटी तीन जण सोडून सर्व मरण पावले. त्यांनी असा विचार केला की जेवढे लवकर हे बेट सोडू तेवढे बरे होईल. म्हणून त्यांनी धोका पत्करला आणि तो भयंकर समुद्र आणि वादळी धोका पार करण्यासाठी होड्या सोडल्या. शेवटी ते कार निकोबार बेटावर पोचले.

घरी पोचल्यावर त्यांनी खेडुताना आपल्या बरोबरीच्या खलाशांच्या दुर्दैवी मरणाची माहिती दिली. मरण पावलेल्यांच्या नातेवाईक आणि मित्र यांनी जिवलंगासाठी दुःख प्रदर्शित करण्यासाठी रडण्यास सुरुवात केली.

सर्व गावांचे प्रमुख एल-पा नाम मध्ये एकत्र जमले आणि त्यांनी निर्णय घेतला की, चेटूक विद्या पारंगत टामिलुआनास याला बोलावायचे. फक्त त्याच्यामध्ये आत्म्याशी



बोलण्याची आणि छड्या, ठराविक पाने आणि विभूती यांचा वापर करून केलेल्या विधीद्वारे शांती करण्याची शक्ती आहे.

टामिलुआनास लाल कापड आणि पांढरी फित गुंडाळलेली काळी टोपी घालून आला. शिंपल्याचे मणी आणि जुनी नाणी त्यांनी मानेभोवती आणि दोन्ही हाताभोवती दोऱ्यामधून घातली होती. कोवळ्या केळीच्या पानांचे हार त्याच्या मानेभोवती होते. मानेभोवती त्याने चांदीचा पट्टाही गुंडाळला होता आणि पैंजण व चांदीची साखळी कमरेला लपेटली होती. त्याने खोबरेल तेलाची खळ आमि पिवळी हळद संपूर्ण चेहऱ्यावर आणि शरीरभर फासली होती. त्याने बरोबर तलवार आणली होती. त्याचे कारण त्याला वाटले की, दुष्ट आत्मा खूप शक्तीमान असला तर त्याच्यावर मात करण्यासाठी जादू किंवा हत्यार यापैंकी एकाचा वापर करावा.

टामिलुआनासने समुद्र किनाऱ्यावर त्या घातकी आत्म्याला परतवून लावण्याच्या विधिला सुरुवात केली कारण तो आत्मा त्या दुर्दैवी होडीबरोबर त्या गावात पोचला होता.

ग्नुनोटा हा विधी सर्व मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या वतीने करण्यात आला. त्यांची शरीरे आणू न शकल्यामुळे काना अवन विधीसुद्धा उरकण्यात आला.

भूत घालवणे, कुंचल्याने झाडणे आणि नारळाच्या पानांनी वारा घालणे अशा प्रकारे दीर्घकाळ पार पडलेल्या त्या विधीने दुष्ट आत्म्यावर मात करण्यात आली.

टामिलुआनास यास साक्षात्काराने कळले की, मृत्यूमुखी पडलेल्यांचे आत्मे भुकलेले आणि तहानलेले आहेत. म्हणून एक जंगी मेजवानी देण्यात आली.

त्याच्या आज्ञेप्रमाणे बेटावरील सर्व लोकांनी हवन केला. त्यांनी शर्यतीत भाग घेणाऱ्या होड्या तोडून टाकल्या जेणेकरून आत्म्याचा शाप चुकवला जाईल. तरुणांनी डुकरांना मारण्यासाठी त्यांचा जोरदार पाठलाग केला. नारळ, भूक भागवणारी फळे, रताळी, केळी आणि पपया एकत्र जमविण्यात आले. एक जंगी मेजवाणीचे आयोजन करण्यात आले. आणि त्यानंतर नृत्ये आणि गायनाचा कार्यक्रम झाला.

जंगी मेजवानीच्या सोहळ्यानंतर टामिलुआनास याने जाहीर केले की, ‘मृत्यूमुखी पडलेल्यांचे आत्मे शांत झाले आहेत आणि दुष्ट पिशाश्च हाकलून देण्यात आले आहे. आता गावकऱ्यांनी शांतपणे जीवन जगावे.’

❑❑❑

## 24

# राजकन्या आणि तिचा पाळीव कुत्रा

एकदा बर्माच्या राजकन्येला तिच्या वडिलांनी तिच्या राज्यातून हद्दपार केले आणि त्याचे कारण होते तिने पाळीव कुत्र्याशी केलेल्या अनैसर्गिक संबंधामुळे तिला आलेले आक्षेपार्ह गर्भारपण. तिला आणि तिच्या पाळीव कुत्र्याला एका तराफावर बसवून प्रवाहात सोडण्यात आले.

उत्तरेकडील वाऱ्याने वाहून तिचा तराफा एका अज्ञात स्थळी पोचला: आपला काळिमा पुसण्यासाठी तिने आपल्या कुत्र्याला विष देऊन मारून टाकले. हे विष तिने जगणे अशक्य झाल्यास स्वतः आत्महत्या करण्यासाठी आणले होते.


तिने आपले दिवस भयानक एकांतात काढले आणि ती फळे आणि नारळ खाऊन जगत होती. एक दिवशी सकाळी तिने राजपुत्रावत दिसणाऱ्या सुंदर मुलाला जन्म दिला. त्याचे दर्शन होताच ती आपली सगळी दुःखे विसरली आणि त्याला वाढविण्यासाठी तिने स्वतःला वाहून घेतले. तिला सतत काळजी होती, आपल्या वंशाचे काय होईल याची आणि तिच्या वंशाची पुढे वाढ कशी होईल याची.

जेव्हा तो मुलगा मोठा झाला तेव्हा त्या राजकन्येने आपल्या सगळ्या चिंता दूर करण्यासाठी एक आराखडा तयार केला.

एक दिवशी ती आपल्या मुलाला म्हणाली की, जंगलातील काही नवा भाग साफ कर तो झाडे-फुलझाडे लावून सजवून टाक आणि तिथे एक घर बांध.

त्या मुलाने आईच्या सांगणयाप्रमाणे काम केले. तो त्या उपवनात अनेक दिवस काम करीत होता आणि लवकर जेवण करून झोपी जात होता. एकदा तो गाढ झोपेत असताना आणि सगळीकडे पूर्ण अंधार असताना त्याला आपल्या बिछान्यामध्ये एक सुंदर मुलगी आढळली. असा प्रकार अनेक रात्री होऊ लागला. मात्र सुर्योदयापूर्वी ती मुलगी नाहिशी होत असे. तो मुलगा त्या मुलीच्या खूप प्रेमात पडला आणि तिच्या पासून वेगळे होण्याची कल्पना त्याला सहन होईना. एक दिवशी त्याने हा प्रकार आपल्या आईला सांगितला. तिने त्याला इच्छा असेल तर तिच्याशी लग्न करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

दुसऱ्या रात्री जेव्हा ती मुलगी सुंगधी फुलांचे दागिने घालून त्याच्याजवळ आली. त्याने तिला मागणी घातली. ती त्याच्याशी विवाह करण्यास तयार झाली. त्या रात्री ते विवाहबद्ध



झाले आणि ती रात्र अतिशय सुखात घालविली.

परंतु दुसऱ्यादिवशी उजाडताच त्या मुलाच्या लक्षात आले की ती मुलगी दुसरी तिसरी कुणी नसून प्रत्यक्ष त्याची आईच आहे. खरं म्हणजे ती राजकन्या दररोज रात्री वेष पालटून मुलाला भेटत होती. आपल्या वंशाची वाढ व्हावी हीच इच्छा त्यामागे होती.

त्या राजकन्येने आपल्या मुलाला सगळ्याचे स्पष्टीकरण दिले आणि त्या राजपुत्रालाही आपला वंश बेटावर राहावा याची आवश्यकता पटली. अशा प्रकारे ती राजकन्या आणि तिचा मुलगा अनेक वर्षे आनंदाने जगले आणि एका मोठ्या कुटुंबाचे पूर्वज होण्याचा त्यांनी मान मिळवला.

असे म्हटले जाते की, या जोडप्यांची अपत्ये हे निकोबार वासियांचे पूर्वज होत.

❑❑❑

## 25

# *मुलगा आणि व्हेल माशाची गोष्ट*

कोणे एकेकाळी निकोबार बेटावर अरोंग नावाचा माणूस आपली पत्नी आणि मुलांसह सुखाने राहत होता. त्याने मासेमारीतून खूप संपत्ती गोळा केली होती. त्याच्याकडे अतिशय सुंदर घर आणि होरी नावाची बोट होती.

त्याच्या मोठ्या मुलांचे नांव शान होते. तो आपल्या वडिलांवर गेला होता आणि त्यांच्याप्रमाणे त्याला पोहण्यामध्ये आणि होड्या बनविण्यामध्ये खूप आनंद मिळत असे.

एक दिवशी अरोंगने मासेमारीसाठी समुद्रात खोलवर जाण्याचे ठरविले. त्यांनी देव-देवतांना प्रसन्न करण्यासाठी सगळे समारंभ साजरे केले, जेणेकरून त्याचा प्रवास सुरक्षित व्हावा. तो अतिशय खूष होता कारण आपला मुलगा शान यास अशा मोहिमेवर पहिल्यांदाच नेत होता. त्यादिवशी समुद्र अतिशय शांत होता. उष्ण सूर्य, निरभ्र, निळ्या आकाशात तळपत होता आणि मंद वाऱ्यांनी वातावरणात थंडावा आणला होता. एखाद्या सफरीसाठी ही अगदी योग्य हवा होती.

अरोंगची बायको आणि मुले समुद्रकिनाऱ्यावर त्याला निरोप देण्यासाठी आले होते. त्याची होडी क्षितिजापर्यंत लुप्त होईपर्यंत ते सर्वजण अरोंग आणि शानला हातानी निरोप देत होते.

समुद्रामध्ये अरोंग आपल्या मुलाला मासे पकडण्यामधील युक्त्या सांगण्यात दंग होता. ते मासेमारीत एवढे तल्लीन झाले होते की, त्यांचे एका गोष्टीकडे दुर्लक्ष झाले आणि ती गोष्ट म्हणजे बाजूला जमा होणारे तुफान. जबरदस्त वादळाने जोराने हल्ला करण्यास प्रारंभ कला होता. अरोंग मासे पकडण्यामध्ये इतका दंग झाला होता की त्याचे वातावरणात होणाऱ्या बदलाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले.

लवकर ते वादळ त्यांच्यापर्यंत आले आणि समुद्र बेफाम झाला. शानने असे भयंकर दृश्य अगोदर कधी पाहिले नव्हते. जेव्हा एक प्रचंड लाट त्यांना गिळण्यासाठी झेपावली त्याने वडिलाना म्हणताना ऐकले की मुला, 'होडीला चांगले पकडून ठेव. कुठल्याही स्थितीत पकड सोडू नकोस आणि दुसऱ्याक्षणी ते दोघे लाटेखाली सापडले होते.

जेव्हा ती होडी पृष्ठभागावर आली, शान तिच्यावर एकटा होता. त्याच्या वडिलांचा कुठे पत्ता नव्हता. त्या बेफाम समुद्रात तो मुलगा एकटा पडला होता. तो ओरडत होता. परंतु



त्याचा आवाज त्या वादळाचे घोंद्यावणे गिळून टाकत होते. ओरडण्याने थकून तसेच भूक व तहानेने व्याकून होऊन तो लवकर मूर्च्छित झाला.

जेव्हा त्याला जाग आली आत्याला आपल्या शरीराला धक्के बसत असल्याचे जाणवले. त्याने आजूबाजूला पाहिले आणि त्याच्या लक्षात आले की एका व्हेल माशाच्या पाठीवर तो बसलेला आहे. घाबरलेला शान ओरडला, 'अरे तू कुठे चालला आहेस ?'

'कुठेच जात नाही व्हेलने उत्तर दिले.'

शानला भीती वाटली आणि त्याने रडण्यास सुरुवात केली. त्या माशाने त्याला शेपटीने थोपटून त्याचे सांत्वन केले.

'मी या समुद्राचा राजा आहे. तू माझी सुचना मान्य केलीस , तर मी तुला वाचविन' हुंदके देत शानने विचारले, 'तुझी सुचना काय आहे ?'

'मला एक सुंदर मुलगी आहे. तुला तिच्याशी लग्न करायला आवडेल!' व्हेल म्हणाला. शानला आपली आई, भाऊ आणि बहिणी आठवल्या.

'मला जर कधी यांना भेटायचे असेल तर मला व्हेलची सूचना मान्य करायलाच हवी. नाहीतर मी मरेन. एकदा मी वाचलो तर मी माझ्या घरी जाण्याचा मार्ग शोधून शकेन' तो स्वतःशी म्हणाला.

त्याने मान्य केल्याबरोबर व्हेलने त्याला आपल्या पंखामध्ये व्यवस्थित बसविला आणि त्याने खोल समुद्रात उडी घेतली.

ते समुद्राच्या तळाशी पोचले. तिथे प्रवाळामध्ये बिलोरी काचेचा त्याचा राजवाडा लुकलुकत भूरळ घालीत उभा होता.

तिथे त्या व्हेलची मुलगी गोरीची भेट झाली. ती अतिशय गर्विष्ट आणि उद्धट वागत होती आणि शानला कर्कश आवाजात सतत आज्ञा करू पाहत होती. ती सतत कशाची तरी मागणी करायची आणि शानने तिच्या लहरीपुढे नमावे असे तिला वाटे. दिवसें दिवस तो कुटुंब विरहाने अधिक दुःखी झाला.

तिटकारा वाटत असूनसुद्धा त्यांनी एका मोठ्या धाडसाने तिच्याशी विवाह केला होता आणि तिला तो आनंदी ठेवू पाहत होता, कारण ती त्याला बिलोरी राजमहालातून सुटका करण्यात मदत करू शकणार होती. तो राजवाडा अगदी पारदर्शक होता आणि तो जिथे जिथे जात होता तो टाटगर व्हेल त्याचा पाठलाग करीत होता. एकदा त्याने खिडकीच्या बाहेर डोकावून पाहिले आणि एक प्रचंड वजनाच्या व्हेलने त्याला परत आत ढकलले.

त्याने आपल्या गर्विष्ट पत्नीला फसविण्याची योजना आखली. एकदिवशी तो तिला म्हणाला, 'तू किती सुंदर आहे ! तू स्वतःला पाहू शकली असतीस तर ? खरंच मला वाईट वाटते. तुझ्याकडे सगळ्या वस्तु आहेत परंतु एक आरसा नाही.'

'आरसा ! आरसा म्हणजे काय ?' त्याच्या बायकोने विचारले.

'हा आरसा म्हणजे एक अलौकिक गोष्ट होय. तू तुझा चेहरा त्यात पाहू शकतेस.'

'म्हणजे ही जादू काय?'

'नाही, मुळीच नाही. तुला जर आरसा हवा असेल तर मी तुला एक माझ्या गावातील घरामधून आणून देऊ शकतो. परंतु मी माझ्या घरी कसा काय जाऊ शकेन ?'

'ती मुळीच समस्या नाही, लाडक्या. आपण उद्या निघू या. ठिक आहे !'

दुसऱ्या दिवशी ते प्रवासाला निघाले. व्हेल मासा चपळतेने पोहत होता आणि लवकरच ते बेटावर पोचले. शानने तिला खडकांच्या प्रवाळामध्ये लपण्यास सांगितले, नाहीतर ती पकडली गेली असती.

दरम्यानच्या काळात संपूर्ण बेटाने अटोंग आणि त्याचा मुलगा शान यांचे निधन झाल्याचे गृहीत धरले होते आणि ते अस्सुअरी मेजवानीची तयारी करीत होते. शानची आई भाऊ आणि बहिणी त्यांच्यासाठी शोक करीत होत्या.

शान त्यांच्याजवळ गेला आणि त्यांनी त्याच्या दुर्दैवाविषयी तसेच त्याचे वडील अरोंग कसे मृत्युमुखी पडले आणि त्याला व्हेल माशाशी विवाह कसा करावा लागला त्या सगळ्या प्रकारांविषयी सांगितले.

चेटूक विद्या पारंगताला बोलावण्यात आले आणि भूतबाधा प्रयोगानंतर त्याने त्यांना सांगितले की, व्हेल दुष्ट पिशाश्च आहे आणि शान जर परत गेला तर तो त्याला गिलंकृत करील. चेटूक पारंगताने मंत्रोघोष करीत, कुंचल्याने झाडीत आणि फुंकारीत आपल्या जादूची करामत सुरू केली. एकाएकी एक वादळ जोरदारपणे वाहू लागले. समुद्र बेफाम झाला आणि प्रचंड लाटा किनाऱ्याकडे येऊन धडकू लागल्या जणू काही त्या वादळाला ते संपूर्ण गाव वाहून नष्ट करायचे होते. चेटूक पारंगताने सांगितले की, गावातील कुणी कुणाला काही वचन दिले असेल तर ते त्याने ताबडतोब पूर्ण करावे. नाहीतर कुणी जिवंत राहणार नाही. शानला व्हलेला दिलेले वचन आठवले. तो तडक घरात गेला आणि आरसा घेऊन बाहेर आला आणि त्याने तो समुद्रात भिरकावून दिला. क्षणात व्हेलच्या पिशाश्च्याने हवेत उडी मारली आणि पंखाने तो आरसा पकडला. लगेच तो अदृश्य झाला हळूहळू आणि समुद्र शांत होत गेला.

आतासुद्धा जेव्हा लाटा किनाऱ्यावर जोरात आदळतात आणि त्यांना फेस येतो तेव्हा स्थानिक खेडूताना एका व्हेल माशाने कार निकोबारच्या मुलाशी लग्न केल्याची गोष्ट आठवते.

❑❑❑

# 26

# (गाण्यातील लोककथा)

## *परदेशी पिशाश्च्याची गोष्ट*

खूप खूप वर्षापूर्वी एक जहाज कार निकोबार बेटावर आले. जहाजावरील सगळे खलाशी काळे होते. फक्त लांब दाढी असलेला गोरा होता. त्यावरील सामान आणि तोफा खाली उतरताच ते जहाज तळाशी गेले आणि त्याने कालव्याचे तोंड बंद झाले. खलाशी आणि कप्तान अन्नाच्या शोधात भटकभटक भटकले आणि शेवटी तहान आणि भूक न शमल्यामुळे मेले. खलाशांची भूते वटवाघुळे आणि उडणाऱ्या कोल्ह्यामध्ये अवतरली. जहाजाच्या कप्तानाने खेडुतांना बंदुकीच्या धाकाने ठार मारण्याची धमकी दिली म्हणून तो मेल्यानंतर त्याचे दृष्ट पिशाश्च बनले. ही गोष्ट आहे टो-सॅनेटची अथवा सिआ टो-ऑयनीच्या दृष्ट परकीयाची (ज्याचे आगळ्या बंदुकीने अनेकजणांना मृत्यूमुखी पाडले) ही कथा एका लोकगीतात गुंफली आहे, जी आजही गायली जाते-

जुन्या काळात आम्ही कुठल्या जहाजाविषयी ऐकले आहे का?<br>
सामान आणि तोफा खाली करता जे तळाशी गेले !<br>
आणि त्याने कालव्याचे तोंड झाकले जो एका शेतामधून वाहत होता.<br>
घोडे, तलवारी आणि बंदुकीच्या साहाय्याने<br>
त्यांनी आम्हा कार-निकोबारवाशियांना धमक्या दिल्या.<br>
आणि ते सगळे उघडणारे कोल्हे आणि वटवाघुळ बनले<br>
ते सारे ओक चोंगवरचे खलाशी होते.<br>
आता ते झाडाच्या पारंब्याना उलटे लटकत आहेत.<br>
त्यांनी आमची पिके फळे आणि सगळे नष्ट केले.<br>
आणि आमची डुकरेही बोलवल्यानंतर घरातून बाहेर आली.<br>
आता नारळाच्या पानांचा झगा घालून तो डुकरे पाळणारा



डुकरांना फळे भरवित आहे, जिथे पिशाश्च वास करतात.
डुकरांच्या घरामागून बंदुकीचे आवाज येतायेत
डुकरांना भरवताच तो त्याने घाबरून जातो.
कदाचित परकीय पिशाच्च त्याला तलवारीने भोसकले म्हणूनही.
मित्रानो म्हणा, ते लुटारू तुमचे अनेक वर्षाची डुकरे
तुमच्यापासून हिसकावून नेत आहेत.

❑❑❑

# 27

# लोकगीते

निकोबारी अतिशय प्रणयशील आणि भावनाप्रधान आहेत. स्त्री दाक्षिण्य ही मुख्य भावना तरुणांना त्यांचे प्रेम प्रेयसीकडे व्यक्त करण्यास स्फूर्ति देते. प्रणयाची मागणी अशा प्रेम गीतातून साधारणतः व्यक्त होते. अशा गाण्याचे सूर खुप लयबद्ध असतात आणि गाण्याचे कडवे जागेप्रमाणे बदलत असते. काही गाणी करून रस व्यक्त करतात. परंतु त्यातील बहुतेक आनंद वर्णन करणारी आहेत. निकोबार रहिवाशांमध्ये स्त्री-पुरुष खूप मुक्तपणे एकत्र येतात. इच्छुकाची प्रेमयाचना करण्यासाठी साधारणेपणे मुली-मुलींचे आनंदी गट गाणी गातात आणि नृत्य करतात.

निकोबार रहिवाशांनी संगीतबद्ध केलेली ही काही प्रेमगीतेः-

(1)

मी तुझ्यासाठी गातो.
आणि गातोय सर्व इच्छेनिशी कारण तू इतकी गोड आहेस
थोडावेळे इकडे ये ना ऽ
माझ्या हातातील तुझ्या चित्राकडे बघ
आणि लक्ष असू दे तुझ्या नंबरावर
तसेच  तुझ्या नाववरसुद्धा.
आणि असं वाटतंय की एक सुंदर तरुणी जातेय
मी थेट तुझ्याशी बोलतोय
मी तुला कापलेली लोकर देतो
जसे आपण सा-मोई नाही आहोत
आणि आपण प्रेमात आहोत.

(2)

माझे आवडते माणूस कुठे आहे ?
तो कुठे लपला असावा ?

त्याचा विचार मला त्रास देतोय
की तो इथे का आला नाही ?
मला पंख नसलेला पक्षी व्हावेसे वाटतंय
दूर पळून जाण्यासाठी नि स्वर्गात बसण्यासाठी
परंतु मी मोठ्या घरीच तर आहे !
तो जर एकाकी जागी बाहेर जातो
मग तो फक्त इथे काड नाही ?

(3)

ये नखरेबाज मुली,
तू फक्त माझाच विचार कर !
तू काय म्हणशील याची मला काळजी वाटते.
काय ते बरेः ओह, ओह, ओह, ओह !
पण मी तुम्हा दोघांना पकडले
तू आणि तो-जो तुझा प्रियकर नाही.
असं वाटतं तू प्रियकर विसरून अधिक दोष घेतेस
काय ते बरे : ओह-ओह, ओह-ओह

(4)

तुझ्यासारखी कोण आहे?
स्वतःचे लग्न लावून देणारी
दुसऱ्या बाईच्या नवऱ्याकडून कानउघडणी करून घेणारी
तू काही तरुण विवाहीत मुलगी नाहिस.
तू खरंच ते करतेस, मी दोघांना माझ्या डोळ्यांनी पाहिले
तुम्ही एकमेकांशी व्यभिचार करीत आहात
तो लाजला हे खरं नाही का?
त्यांनी हे करायला नको होते
सर्व प्रमुख त्यासाठी खजील झाले आहेत.
हे जाणून की तू तुझ्या कामुकतेला दोषी आहेस
तू तुझ्या आईबापाचं ताब्यात नसलेलं मूल आहेस

तू जवळपास सर्व तरुण अविवाहितांना भेटतेस
आणि तुझी एक सवय की सर्वांना होय, होय म्हणते,
सौंदर्याची गर्विष्ट तू सर्वावर प्रेम करतेस
तुझ्यासारखं कोण आहे ?
फक्त स्वीकारायचं नि कधी प्रतिकार नाही करायचा
कारण तुला हव्या त्या गोष्टी सहज मिळतात.

❑❑❑

Indian Institute of Advanced Study
117508.
15/12/04
SHIMLA

अंदमान आणि निकोबार बेटांना निसर्गाने सौंदर्याचे वरदान दिले आहे. त्यामध्ये अधिक महत्त्वाचे म्हणजे अंदमान आणि निकोबारच्या आदिवासी जमातीचे अस्तित्व होय. या आदिवासींच्या बहुतेक चालीरीती व आचारपद्धती आधुनिकतेच्या जोरदार हल्ल्यापुढे नष्ट झाल्या आहेत आणि मुख्यतः जुन्या काळच्या लोककथा शिल्लक राहिल्या आहेत. निकोबारी संस्कृति ही सांगीव परंपरा असून ती लोकगीते आणि लोककथा या प्रकारच्या माध्यमातून व्यक्त होते. आदिवासींची सामाजिक परिस्थिती आणि लोककथांची विशेषता लक्षात घेता लेखकाने अनेक निकोबारी लोककथा जमविण्यात प्रशंसनीय काम केले आहे. शिवाय या पुस्तकामध्ये निकोबार बेटांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्यांच्या श्रद्धा, चालीरीती आणि साजरे केले जाणारे वेगवेगळे सण यांचा समावेश केला आहे. चित्रकार स्वप्नेश चौधुरी यांची उत्कृष्ट रेखाचित्रे या कथांची मोहकता आणखी वाढवितात.

रॉबिन रॉयचौधुरी (जन्म 1940 ... आणि बंगाली लघुनियतकालि... आहेत. त्यांची 6 पुस्तके प्रकाशि... आणि निकोबार बेटांच्या शिक्ष... संचालनाल... करतात.

Library IIAS, Shimla
MR 398.209 548 8 R 813 N
00117508

Nicobarchya Lokkatha (Marathi), Rs. 60
ISBN 81-260-1773-2

साहित्य

22 भाषांमधून पुस्तके प्रकाशित करणारी